महाबाहोदुःखमाप्तुमयोगतः॥योगयुक्तोमुनिर्ब्रह्मनचिरेणाधिगच्छ
ति॥६॥ ॥सम०॥ ॥सन्यासतोनव्हेऐसाजोकर्माविणदुर्लभ॥क
र्मयोगेंजोमुनीतोब्रह्मसत्वरपावतो॥६॥ ॥आर्या॥ ॥संन्या
समहाबाहोयोगावांचोनिफारदुष्करतो॥योगेंयुक्तचिमुनितोब्रह्म
प्राप्तीसिंशीघ्रतोकरतो॥६॥ ॥दोहरा॥ ॥लहतसंन्यासदुः ॥३॥
खसोंबिनकरमनुरेमीत॥जोगजुगतीजोकरेलहतब्रह्मनिश्चित॥

गी० ओवी॥ ॥ऐसासंन्यासनजाणिजे॥कर्माविणकेंविपाविजे॥ अ०
कर्मयोगेंजाइजे॥ब्रह्मलोकीं॥६॥ ॥अभंग॥ ॥नव्हेऐसा ॥५॥
तोसंन्यास॥दुर्लभकर्माचीणवोस॥१॥कर्मयोगआचरणीं॥घेती
स्वरूपनिर्वाणी॥२॥पावेझडकरीपरब्रह्म॥ऐसामार्गहासुगम
॥३॥तुकाह्मणेआनयेक॥ऐकाबुद्धिचेबोधक॥४॥६॥ ॥श्लोक॥
योगयुक्तोविशुद्धात्माविजितात्माजितेंद्रियः॥सर्वभूतात्मभूतात्मा
कुर्वन्नपिनलिप्यते॥७॥ ॥सम०॥ ॥कर्मयोगेंशुद्धचित्तजिं
किलींइंद्रियेंमन॥जोदेहजीवभूतात्माकरितांहिअलिप्ततो॥७॥
॥आर्या॥ ॥विजितात्माशुद्धात्मायोगींरतजोजितेंद्रियग्राम
आत्मासकळांचातोकर्मेंकरुनीअलिप्तनिष्काम॥७॥ ॥दोहरा॥
विंद्रिजितवेंहैंशुधहिजोगज्युगतजोकोय॥जीवतजानेंआतमा
फरमलेसरूनहोय॥७॥ ॥ओवी॥ ॥योगकर्मकेलिया॥
शुधत्वहोयआत्मया॥जितेंद्रियाविषया॥करूनिअलिप्तजो॥७॥

अभंग॥ ॥ चित्तशुधि कर्मयोगें ॥ कोणा पुसावें न लागे ॥१॥ अ
॥४॥ होजिंकुनियां मन ॥ केलीं इंद्रियें स्वाधीन ॥२॥ जीव भूतांचा जो देह ॥
न लगे किमपी संदेह ॥३॥ अलिस जो करितांही ॥ तुका ह्मणे तो विदेही
॥४॥७॥ ॥**श्लोक॥** ॥नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्व
वित् ॥ पश्यञ्छृण्वन्स्पृशञ्जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपन्श्वसन् ॥८॥
॥**सम०॥** ॥ न कांहीं करितों ऐसें मानितो नित्य तत्ववित् ॥ विषयीं
यीं वर्ततां जातां निजतां श्वास घाहतां ॥८॥ ॥**आर्या॥** ॥अश
नीं घासग्रहणीं निद्राश्रवणीं हि दर्शनीं गमनीं ॥ स्पर्शीं श्वासीं कर्त्त
मी हें तत्वज्ञयुक्त तो न मनी ॥८॥ ॥**दोहरा॥** ॥ ग्यानी करम कर
त है भुलि कियेमान ॥ सूजत सोचत रूपानि तकु निसूनत फिरत ज्या
न॥८॥ ॥**ओवी॥** ॥ कर्म करूनि ह्मणती नाहीं ॥ देखणें आइक
णें पांहीं ॥ गंध भोजन निद्रा गमन तेंही ॥ श्वास टाकणें हीं आठ ॥८॥ ॥४॥
अभंग॥ ॥ ऐसें कांहीं न करी तो ॥ स्मृति साक्षी तें वर्ततो ॥१॥ मा

गी० नी तो नित्याच्यारी ॥ तत्ववेत्ता ब्रह्मचारी ॥२॥ विषयीं वर्ततां जातां अ०
न रूटे समाधि तत्वता ॥३॥ निद्रा घेतो श्वास सांडी ॥ तुका ह्मणे स ॥५॥
हज रवोडी ॥४॥८॥ ॥**श्लोक॥** ॥ प्रलपन्विसृजन्गृण्हन्नुन्मिष
न्निमिषन्नपि ॥ इंद्रियाणींद्रियार्थेषु वर्त्तंत इति धारयन् ॥९॥ **सम०॥**
कर्मेंद्रिय क्रिया होतां निमिषादि हि हालतां ॥ इंद्रियें स्वस्वविषयीं वर्त
तीं मानुनी असे ॥९॥ ॥**आर्या॥** ॥ निपुण हि निमिषोन्मेषीं
दान ग्रहणीं हि भाषण प्रमुखीं ॥ करणें करणार्थीं हीं वर्तति भावुनि सदा
विदेहि सुखी ॥९॥ ॥**दोहरा॥** ॥ जागत सोवत चलत और बो
लत डारत हुं देत ॥ बिंद्रि बिरवय न सों लगी जानत यह हेत ॥९॥ **ओवी॥**
बोलणें आणि घेणें देणें ॥ पातें पातया लावणें उघडणें ॥ हा इंद्रियें व्यापा
र करणें ॥ ऐसें मानू निवर्तती ॥९॥ ॥**अभंग॥** ॥ वाचा पाणि
पाद लिंग ॥ गुद पांच हे कर्मांग ॥१॥ यांच्या आचरतां क्रिया ॥ अंतर
शुध बाहेर माया ॥२॥ निमिषादि कहीं हालतां ॥ छिन्न न व्हे संयोग ता

॥५॥ ॥३॥ इंद्रियें आत्म विषें ॥ पैंचा गतां तुका ह्मणे ॥४॥९॥ ॥श्लोक॥ ॥
ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति यः ॥ लिप्यते न स पापेन पद्म
पत्रमिवांभसा ॥१०॥ ॥समः॥ ॥ ब्रह्मीं अर्पूनियां कर्में संगटा
कूनि जो करी ॥ पापें न लिंपे तो जेसें जळीं कमळिणीदळ ॥१०॥ आर्या
ब्रह्मीं अर्पुनि कर्में करि जो होउनि अलिप्त संग मळीं ॥ पापें लिप्त न रेसे तो
कमळदळ जसें न लिप्त होय जळीं ॥१०॥ ॥दोहरा॥ ॥ करम क
रेत जि संग कों सब कों ब्रह्म ज्यान ॥ ताकों पाप न हि लगत है पद्म पत्र ज
ऊमान ॥१०॥ ॥ओवी॥ ॥ ब्रह्मार्पण कर्म करी ॥ संग त्यजूनि अ
से निर्धारी ॥ पापें न लिंपे ऐसिया परि ॥ पद्म पत्र उदकीं जैसें ॥१०॥
॥अभंग॥ ॥ कर्में ब्रह्मीं अर्पून ॥ जालें मानस उन्मन ॥१॥ करी सं
डुनियां संगु ॥ निरपेक्ष तो चि चांगु ॥२॥ पापें न लिंपे तो जेसें ॥ स्फटि
क रंगाचे कडवसें ॥३॥ जळीं पत्र कमळिणीचें ॥ तुकया सि साम्य ॥५॥
त्याचें ॥४॥१०॥ ॥श्लोक॥ ॥ कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिं

गी० द्रियैरपि ॥ योगिनः कर्म कुर्वंति संगं त्यक्त्वात्मशुद्धये ॥११॥ ॥ अ०
समः॥ ॥ कायामनें बुद्धिनें ही वासनातीत इंद्रियें ॥ चित्त शुद्ध्य ॥५॥
र्थ करिती संगटाकूनियां क्रिया ॥११॥ ॥आर्या॥ ॥ देह मन बु
द्धियांहीं योगी गतवासनें द्रिया सहित ॥ निज चित्त शुद्धि साठीं संग
त्यागूनियां क्रिया करित ॥११॥ ॥दोहरा॥ ॥ देह बुद्धि मन इंद्रि
यन जोगी हुये निःसंग ॥ करम करत अति चाह सों चित्त सोच कढंग ॥
॥११॥ ॥ओवी॥ ॥ कर्म फळाची इच्छा त्यजूनी ॥ शांतिनिष्ठा
पावे मनीं ॥ काया मनें युक्त आचरोनी ॥ फळ टाकूनि कर्म करी ॥११॥
अभंग॥ ॥ काया मानस येकाग्र ॥ बुद्धि होऊं नेदी उग्र ॥१॥ गेली
वासना पळाली ॥ करणें येका पंथीं आलीं ॥२॥ मग यां छी चित्त शु
द्धि ॥ करी निःसंगत्व सिद्धि ॥३॥ संग टाकुनियां क्रिया ॥ स्वात्म प्रा
प्ति हेतु कया ॥४॥११॥ ॥श्लोक॥ ॥ युक्तः कर्मफलं त्यक्त्वा
शांतिमाप्नोति नैष्ठिकीं ॥ अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते

॥१२॥ ॥**सम०**॥ ॥ योगीकर्मफळत्यागें स्थितीची शांति पावतो॥ सकाम कामसंकल्पें बद्ध होतो फळीं रत॥१२॥ ॥**आर्या**॥ ॥ त्यागुनि कर्मफळा तें पावे तो मुक्त नैष्टिकी शांती॥ कामें अयुक्त बंधा कर्मफळासक्त पावतो अंतीं॥१२॥ ॥**दोहरा**॥ ॥ ग्यानी ढुमुगतीलहे करमकरे फल छांड॥ मूरख फलकी आस करे बंध कामना आड॥१२॥ ॥**ओवी**॥ ॥ ज्ञानी मुक्तितें पावती॥ कर्म करूनि फलेच्छा टाकिती॥ कामनाबंधें पडती॥ ते बद्ध होत॥१२॥ ॥**अभंग**॥ योगी ऐशा चिन्हीं जाण॥ कर्मफळीं निराकरण॥१॥ आत्मस्थितीस पावला॥ सहज शांति आली त्याला॥२॥ सकामता लागे पाप॥ जेथें कामना संकल्प॥३॥ बद्ध फलाशें बाधतो॥ तुका ह्मणे वायां जातो॥४॥१२॥ ॥**श्लोक**॥ ॥ सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन्॥१३॥ ॥**सम०**॥ करूनि कर्में संन्यासी मनें होऊनियां सुखें॥ असे नवद्वारपुरीं कांहीं न करवी करी

॥१३॥ ॥**आर्या**॥ ॥ करुनी कर्में हि मनें संन्यासी होउनी असे स्वसुखें॥ देह नवद्वारपुरीं कांहीं न करी स्वयें न करवि सुखें॥१३॥ ॥**दोहरा**॥ मन न करी करम जे तजत ग्यानी तिनकों मान॥ नवद्वार पुरमे बसत ले तसुख की खान॥१३॥ ॥**ओवी**॥ ॥ मनें करूनि कर्में जो त्यजी॥ ज्ञानी त्यास ह्मणिजे जी॥ देहीं नवद्वारपुरीं जी॥ न करी न करवी॥१३॥ ॥**अभंग**॥ ॥ करुनी निष्कामें कर्मास॥ योगी संपादी संन्यास॥१॥ सुखी होउनी यां मनें॥ न करी स्फुद्रादि साधनें॥२॥ नवद्वारे पुरे देहीं॥ वस्ती संरक्षी विदेही॥३॥ स्वयें न करी करवी हि ना॥ तुका ह्मणे इतर जना॥४॥१३॥ ॥**श्लोक**॥ ॥ न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः॥ न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्त्तते॥१४॥ ॥**सम०**॥ ॥ कर्तृत्व कर्में लोकांचीं न ईश्वर ही निर्मितो॥ न कर्मफलभोगातें वर्त्ते संसारचक्र हें॥१४॥ ॥**आर्या**॥ ॥ कर्तृत्व कर्म यातें लोकांचें निर्मितो न ईश्वर तें॥ तें विन कर्मफळाच्या भोगा संस्कारचक्र हें वर्त्ते॥१४॥ ॥

॥दोहरा॥ ॥ ईश्वरकरमनकरतनहिकरमकरतार॥ करमफलन
 हिकरतप्रकृतिकरीविस्तार॥१४॥ ॥ओवी॥ ॥ईश्वरनाहींक
र्मकरितं॥कर्तृत्वयालोकांत॥नकर्मफळभोगातें॥संसारचक्रअसे
॥१४॥ ॥अभंग॥ ॥कर्तृत्वकर्मलोकाचें॥अथवात्याच्याप्रपं
चाचें॥१॥ ईश्वरनिर्गुनीनिराळा॥कर्मसाक्षित्वेंवेगळा॥२॥ नतोक
र्मासिकरवी॥अथवाफळश्रुतीभोगवी॥३॥ वर्तेसंसाराचेंचक्र॥तुका
सर्वदाअचक्र॥४॥१४॥ ॥श्लोक॥ ॥ नादत्तेकस्यचित्पापंन
चैवसुकृतंविभुः॥अज्ञानेनावृतंज्ञानंतेनमुह्यंतिजंतवः॥१५॥
सम०॥ ॥कोणाचें पापहिनेघेनेघेपुण्यहिईश्वर॥ अज्ञानेंवेष्टिलें
ज्ञानत्याणेकरितिभोगिती॥१५॥ ॥आर्या॥ ॥कोणाचेंअघ
नेघेनेघेपुण्यासहिविभूपरतू॥ अज्ञानज्ञानानेंअवरीतेणेंचिमोह
तीजंतू॥१५॥ ॥दोहरा॥ ॥एककृतिनकाहुकोंगहेंऔरपापन
हिलेत॥छायोग्यानअग्याननेमोहनप्रगटनदेत॥१५॥ओवी॥

 कोणाचेंपापनघेजाण॥पुण्याचेंनलगेकारण॥अज्ञानेंवेष्टिलेंजन॥त्या
णेंभोगभोगिती॥१५॥ ॥अभंग॥ ॥ पापहिनेघेतोकोणाचें॥जेणें
योगेंपुरदुःखाचे॥१॥नेघेपुण्यहीईश्वर॥पावावयास्वर्गद्वार॥२॥अज्ञा
नाचेजेंवेष्टित॥ज्ञानमोहेंविष्फळित॥३॥ यास्तवकरितीभोगिती॥तुका
ह्मणेअहंमती॥४॥१५॥ ॥श्लोक॥ ॥ज्ञानेनतुतदज्ञानंयेषांनाशित
मात्मनः॥तेषामादित्यवज्ज्ञानंप्रकाशयतितत्परम्॥१६॥ सम०॥ ॥
अज्ञानबुद्धिचेंजांचेतेंज्याज्ञानेंनिनाशिलें॥पराजडानेंतें त्यांचेंप्रकाशीज्ञा
नसूर्यवत्॥१६॥ ॥आर्या॥ ॥ आत्मज्ञानेंज्यांचेंअज्ञानसमूळपाव
लेंनाश॥सूर्यापरिदावीतेंज्ञानप्रगटोनिआत्मरूपास॥१६॥ दोहरा॥
दूरेकियोअग्यानजिनहियेंग्यानप्रगटाय॥देखतईश्वररूपतेंग्यानिसू
रकेदाय॥१६॥ ॥ओवी॥ ॥ अज्ञानगेलियावरी॥ज्ञानप्रगटवीअं
तरीं॥तोईश्वररूपनिर्धारी॥ज्ञानवंतजाणतूं॥१६॥ ॥अभंग॥ ॥
अज्ञाननिजबुद्धिचें॥नासिज्ञानजिव्हाळ्याचें॥१॥परिज्ञानशुध्दचोखट

नाशिअज्ञानाचेंदुःख॥२॥ पराजडाचेतेंज्यांचे॥ अंधनेच्चतिमिराचे॥३॥
 ज्ञानसूर्यउदयांत॥तुकाजालास्वरूपवंत॥४॥१६॥ ॥श्लोक॥ ॥
तद्बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः॥गच्छंत्यपुनरावृत्तिंज्ञाननि
र्धूतकल्मषाः॥१७॥ ॥सम०॥ ॥त्याचिज्ञानींबुद्धिचित्तनिष्ठातेंपर
माश्रय॥असेतेपावतीमोक्षज्ञानेंजाळूनिसंचित॥१७॥ ॥आर्या॥
तन्निष्टतत्परायणंअर्पुनिमनबुद्धिईश्वरींसारी॥नपवतिपुनरावृत्तिज्ञा
नेंनाशोनिकल्मषेंभारीं॥१७॥ ॥दोहरा॥ ॥जोमनकोंओरबुद्धिकों
रोखतईश्वरमाह॥जनममरणतिनकोंनहिंमुगतहोतनरनाह॥१७॥ ॥
ओवी॥ ॥जेंमनआणिबुद्धितें॥ ईश्वरस्थापनेंनिश्चितें॥भयनाहीं
तयातें॥मुक्तहोय॥१७॥ ॥अभंग॥ ॥बुद्धिचित्तत्याविज्ञानी
येकविधनियमुनि॥१॥परमाश्रयेंतेंचिनिष्ठा॥साजेसदायोगभ्रष्टा
॥२॥मोक्षपावतिऐसेते॥विश्वभरीयेकचित्तें॥३॥तुकाह्मणेंदग्धके
लें॥ज्ञानेसंचित्तजाळिलें॥४॥१७॥ ॥श्लोक॥ ॥विद्याविनयसं

पन्नेब्राह्मणेगविहस्तिनि॥शुनिचैवश्वपाकेचपंडिताःसमदर्शिनः॥१८॥
 ॥सम०॥ ॥विद्यासद्गुणसंपन्नींब्राह्मणींधेनुहीमधें॥गंजींश्वानां
तचांडाळींपाहतीसमपंडित॥१८॥ ॥आर्या॥ ॥विद्याविनयीब्रा
ह्मणगायश्वपचगज्ञआणितींश्वानें॥पाहतिसमदृष्टीजेपंडिततेंवं
दिजेतविश्वानें॥१८॥ ॥दोहरा॥ ॥विद्याविनयस्रुधजेगोगजभू
करश्वान॥ग्यानीइनकोंगणतहेभेदछेतनहिमान॥१८॥ ॥ओवी
विद्याविनयसंपन्न॥गायगजभूकरश्वान॥हेजयासिसमजाण॥
तोचिज्ञानीपंडित॥१८॥ ॥अभंग॥ ॥विद्यासद्गुणसंपन्न॥अ
याचितलोकमान्य॥१॥ब्राह्मणींधेनुमध्यें॥यातिभेदादिसंबंधें॥२
गजींशुनींतेंचांडाळीं॥समपंडितुन्याहाळी॥३॥ज्ञानज्यांचेंअखंडि
त॥तुकाह्मणेतोपंडित॥४॥१८॥ ॥श्लोक॥ ॥इहैवतैर्जितः
सर्गोयेषांसाम्येस्थितंमनः॥निर्दोषंहिसमंब्रह्मतस्माद्ब्रह्मणिते
स्थिताः॥१९॥ ॥सम०॥समींमनस्थिरतिहींजितांचभवजिं

किला॥ समतेंब्रह्म निर्दोषतस्माद्ब्रह्मींचतेसमी॥१९॥ ॥आर्या॥
 स्थिरमन समींजयांनेंजितांत्रिभुवजिंकिला तिहींपार्था॥ समतेंब्र
ह्मसुनिर्मळतस्माद्ब्रह्मींचते समींसमता॥१९॥ ॥दोहरा॥ ॥
समता जिनकेजीवमेंतिन जिंत्योसङ्सार॥ समब्रह्महिकोंकहतब्र
ह्मलिहिन निरधार॥१९॥ ॥ओवी॥ ॥ समज्यांचेंजिवींवसे॥त्यां
हींसंसार जिंकिलासे॥ निर्दोषहीवसतसे॥ब्रह्मींतोसम॥१९॥ ॥
॥अभंग॥ सर्व भूतींमन आपुलें॥ जेणेंसमान स्थापिलें॥१॥ तेणें
जीत असतांवीरा॥ केला मातेराभवाचा॥२॥ समब्रह्म तें निर्दोष॥जें
निःशेषनिर्मळ॥३॥ तस्माद्ब्रह्मींनतेसमी॥ तुकयावर्मीमनरातें॥४॥
॥१९॥ ॥श्लोक॥ ॥ नप्रहृष्येत्प्रियंप्राप्य नोद्विजेत्प्राप्यचाप्रिय
म्॥ स्थिरबुद्धिरसंमूढोब्रह्मविद्ब्रह्मणिस्थितः॥२०॥ ॥सम०॥
नहर्षप्रियहोतांजोअप्रियेंघाबरानव्हे॥ स्थिरबुद्धिनजोमूढब्रह्मींब्र ॥९॥
ह्मज्ञजोस्थिर॥२०॥ ॥आर्या॥ ॥ प्रियहोतांहर्षेनाअप्रियहो

गी० तांदुःखजोसाहे॥ स्थिरबुद्धिनजोमूढब्रह्मीब्रह्मज्ञपांडवाराहे॥ अ०
॥२०॥ ॥दोहरा॥ ॥सुखपायेहरखेनहिंदुखपायेनरिसाय ॥५॥
राखेथिरनिजबुध्दिकोंब्रह्मींरहतसमाय॥२०॥ ॥ओवी॥ सुख
झालियाहर्षनाहीं॥ दुःखजालियाक्रोधनाहीं॥ बुध्दीकरूनिस्थिरतेही
तेब्रह्मींपावती॥२०॥ ॥अभंग॥ ॥ नहर्षेप्रियहोताना॥ ज्याच्या
मनानिश्चळता॥१॥ नोहेघाबराअप्रियें॥ ज्ञानरायज्ञान्याचा॥२॥ न
जोमूढस्थिरबुद्धि॥ देहशुध्दीरहित॥३॥ ब्रह्मींस्थिरब्रह्मवेत्ता॥ तुक
याचित्ता मिळाला॥४॥२०॥ ॥श्लोक॥ ॥ बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा
विंदत्यात्मनियत्सुखम्॥ सब्रह्मयोगयुक्तात्मासुखमक्षयमश्नुते॥२
सम०॥ स्पृहानबाह्यविषयीं स्वरूपींपावतोसुख॥ ब्रह्मयोगीयुक्त
चित्ततोभोगीसुखअक्षय॥२१॥ ॥आर्या॥ ॥ बाह्यस्पर्श
त्यागीपावेअंतःसुखासिजोयोगी॥ तोब्रह्मयोगयुक्तज्ञानीअक्षय्य
पूर्णसुखभोगी॥२१॥ ॥दोहरा॥ ॥ बाहरकेंसुखकोंतजेहि

यसुखरहेसुजान॥ ब्रह्मसुखकों धरत लहे जु आनंद मान॥२१॥ ॥
॥१०॥ ओवी॥ ॥बाह्यसुखातें त्यजी॥ हृदयीं आत्मसुख जाणोनजी॥
ब्रह्मसुखीं निरंतर जी॥ अक्षय सुखभोगी॥२१॥ ॥अभंग॥ ॥
स्पृहा न बाह्य विषयीं॥ येके ठायीं येकला॥१॥ सुख पावतां स्वरूपीं॥ स
हज प्राप्तीं त्यागिला॥२॥ युक्तचित्त ब्रह्मयोगी॥ सुखा भोगी अक्षया
॥३॥ तुका ह्मणे या परतें॥ काय उरतें बोलाया॥४॥२१॥ ॥श्लोक
ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते॥ आद्यंतवतः कौंतेय न तेषु र
मते बुधः॥२२॥ ॥सम०॥ ॥जे भोग विषयस्पर्शें ते दुःखाचें चि
कारण॥ आद्यंतवंत कौंतेया रमे ज्ञानी न त्या सुखीं॥२२॥ ॥आर्या
जे विषय भोग पार्था ते दुःखाचे प्रतिक्षणीं दाते॥ उत्पत्ति नाशिवंत स्वब
शें रमविति बुधासि न कदा ते॥२२॥ ॥दोहरा॥ ॥बिखे जी तें संङ्
सारकें ते हे दुःखकों मूळ॥ उपजत बिनसत है तिन्हे पंडत गये न भूल॥२२ ॥१०॥
ओवी॥ ॥स्पर्शें संसार गरळ सार॥ तें दुःखाचें मूळ निरंतरं॥ नाश

गी० होत अपार॥ कौंतेया ज्ञानी सुखी॥२२॥ ॥अभंग॥ ॥जो कां स्प अ०
र्शें भोग विषय॥ मोहो बाह्य धरुनी॥१॥ तें तंव कारण दुःखानें॥ जेथें वे ॥५॥
चें आयुष्य॥२॥ आद्यंतवंत पार्था॥ हे अवस्था भूमिची॥३॥ रमे ज्ञा
नी न त्या सुखीं॥ तुका दुःखी प्रपंचीं॥४॥२२॥ ॥श्लोक॥ शक्नो
तीहैव यः सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात्॥ कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः
स सुखी नरः॥२३॥ ॥सम०॥ ॥जो जितांच शके सोसूं पूर्वी
च मरणाहुनी॥ कामक्रोधादि वेगातें तो योगी तो सुखी नर॥२३॥
आर्या॥ ॥निज मरणाहुनि पूर्वी कामक्रोधादि वेग जो साहे॥ तो
योगी तो चि सुखी तो ज्ञानी योग्य मुक्तिला लाहे॥२३॥ ॥दोहरा॥
कामक्रोधके बेगकों जो साहि सके सुभाय॥ सो जोगी नित हि रहे ता
सुखमें लपटाय॥२३॥ ॥ओवी॥ ॥योगियातें हा योग॥ काम
क्रोधाचा वेग॥ साहूं सके सांग॥ तो योगी सुखी असे॥२३॥ अभंग
जो जितांचि अर्जुना॥ सोसूं भावना शकेल॥१॥ पूर्वीचि मरणाहुनी॥

न्या ह्या कुनीउपेक्षी॥ २॥ कामवेगक्रोधोद्भव॥ स्वानुभवरक्षकु॥३॥
॥११॥ नरतोसुखीतोवियोगी॥ पांडुरंगींतुकयातो॥४॥२३॥ ॥श्लोक॥
योंऽतःसुखोंतरारामस्तथांऽतर्ज्योतिरेवयः॥ सयोगीब्रह्मनिर्वाणं
ब्रह्मभूतोऽधिगच्छति॥२४॥ ॥सम०॥ ॥ सुखीआंतरमे
आंतअंतर्ज्योतिचजोस्वयें॥जालाब्रह्मचितोयोगीब्रह्मनिर्वाणपा
वतो॥२४॥ ॥आर्या॥ ॥अंतःप्रकाशमयजोअंतःसुखयु
क्तअंतराराम॥तोब्रह्मयुक्तयोगीपावेनिर्वाणपांडवाब्रह्म॥२४॥
॥दोहरा॥ ॥जाकेहियेप्रकासहैअंतरसुखआराम॥वहेजोगी
परब्रह्मलहेब्रह्मकोंधाम॥२४॥ ॥ओवी॥ ॥ज्याचेंहृदयप्र
काशे॥अंतरसुखआरामभासे॥ तोवियोगीअसे॥ब्रह्मींनिर्वा
णपावतो॥२४॥ ॥अभंग॥ ॥अंतरसुखीअंतरिरमे॥उं
चप्रेमेंनिर्मळु॥१॥ अंतर्ज्योतींतजोस्वतां॥ निर्मुक्तताप्रपंचीं॥२॥ ॥११॥
योगीब्रह्मचितोजाला॥ सांगत्यालाउणीव॥३॥ पावेनिर्वाणपदा॥

गी० तुकयासदाहरिरूपें॥४॥२४॥ ॥श्लोक॥ ॥लभंतेब्रह्मनि अ०
र्वाणमृषयःक्षीणकल्मषाः॥ छिन्नद्वैधायतात्मानःसर्वभूतहितेर ॥५॥
ताः॥२५॥ ॥सम०॥ ॥पावतीब्रह्मनिर्वाणजेज्ञानीक्षीणपा
तक॥द्वैतनाशेंस्थिरमतीसर्वभूतहितींरत॥२५॥ ॥आर्या॥
निर्वाणब्रह्मातेंपावतिऋषिवर्यजाणनिष्पापा॥छिन्नद्वैतयतात्मे
करणारेसर्वभूतहितबापा॥२५॥ ॥दोहरा॥ ॥जेग्या
नीपापनजजतहोतब्रह्ममेंलीन॥बदनतिनकेजियमेंरहतसबुन
सोंदीन॥२५॥ ॥ओवी॥ ॥प्राणीपापरहित॥ब्रह्मींजे
लीनहोत॥ त्यांचेंसुखत्यांचेहृदयांत॥सर्वभूतहितरतअसे॥२५
॥अभंग॥ ॥लाभेब्रह्मरूपतादेहीं॥ निःसंदेहीआकल्प॥१॥
क्षीणपातकजेज्ञानी॥जगींवरूनीअलिप्त॥२॥ स्थिरमतिना
सेद्वैत॥ यातायातनोळखे॥३॥ सर्वभूतहितींरत॥ पाहातीसंत
तुकयासी॥४॥२५॥ ॥श्लोक॥ ॥कामक्रोधवियुक्ता

॥१२॥ नांयतीनांयतचेतसाम्॥ अभितोब्रह्मनिर्वाणंवर्ततेविदितात्मना
म्॥२६॥ ॥सम०॥ ॥जेकामक्रोधरहितप्रयत्नींवशचित्त
जें॥देहवांचोमरोतेतेंमुक्तकेवळआत्मवित्॥२६॥ **आर्या॥**
कामक्रोधत्यागीजेयतिवशचित्तसाधुजनमेत्र॥ निर्वाणब्रह्मत
याविदितात्म्यालाअसेचिसर्वत्र॥२६॥ **॥दोहरा॥** ॥का
मक्रोधसोंजोरहितबसकीन्होनिजचीत॥ग्यानवंततेहेसदाब्र
ह्मचहुदिसमीत॥२६॥ **॥ओवी॥** ॥कामक्रोधविरहित
आत्माजाणोनिवशकरित॥ तोविज्ञानवंतह्मणत॥ब्रह्मात्मवि
त्॥२६॥ **॥अभंग॥** ॥कामक्रोधाविरहित॥जालासंत
तोयेक॥१॥जेणेप्रयत्नकेलाबहु॥मनवाहुकवळिला॥२॥देह
मगमरोवांचो॥अथवासाचोसंपती॥३॥केवळमुक्तआत्मवि
द॥तुकयापदवंदितु॥४॥२६॥ **॥श्लोक॥** ॥स्पर्शान्कृ ॥१२॥
त्वाबहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवांतरेभ्रुवोः॥ प्राणापानौसमौकृत्वाना

गी० साभ्यंतरचारिणौ॥२७॥ **॥सम०॥** ॥बाहेरबाह्यविषयां अ०
दृष्टितेंभोंवयांमधें॥नासिकींवाहतीप्राणापानांतेंकरुनीसम॥२७॥ ॥५॥
॥आर्या॥ ॥बाह्यस्पर्शत्यागेंभ्रूमध्यामाजिदृष्टिरोधोनी॥
नासांतरसचारीप्राणापानहिसमानसाधूनी॥२७॥ **दोहरा॥**
नजेबिखयसङ्सारकेदृष्टिभोवमेंराख॥प्राणअपानसमकरेना
सनमतअभिलाख॥२७॥ **॥ओवी॥** ॥बाह्यविषयसंसा
र॥त्यजोनिदृष्टिभोंवयांवर॥प्राणायामसमकर॥प्राणअपान
समकरूनियां॥२७॥ **॥अभंग॥** ॥पुढेंसाह्यावेंप्रसंगीं॥
सांगणेंआहेचयोगी॥यालागींतोसारंगी॥दृशयेथेंजाणवी॥
॥१॥आस्थालागावीअर्जुना॥ऐसीमनाचीवासना॥ह्मणोनिसां
ग्यतेंसज्जना॥यथाशक्तिसांगतु॥२॥बाहेरबाह्यविषया॥वीतरा
गेंदापुनियां॥दृष्टिदेउनिभोंवया॥मध्यभागींजचकाशी॥३॥
प्राणींवाहेनिजप्राणु॥तेंविचमेळवीअपानु॥तुकापदेदेतोमानु॥

॥११२॥ लोकामध्यें योगीया॥४॥२७॥ ॥श्लोक॥ ॥यतेंद्रियमनो
बुद्धिर्मुनिर्मोक्षपरायणः॥विगतेच्छाभयक्रोधोयः सदामुक्तए
वसः॥२८॥ ॥सम०॥ ॥बुद्धींद्रियमनस्थैर्यमुनिर्मोक्षप
रायण॥नाहींइच्छाभयक्रोधजालामुक्तचितोसदा॥२८॥ ॥
॥आर्या॥ ॥इंद्रियमनबुधीतेंदमुनीधरिमुक्तिचीमनींचोप॥
तोमुनिमुक्तह्मणावा नाहींज्यालाभयस्पृहाकोप॥२८॥ ॥
॥दोहरा॥ ॥जितविंद्रिबुद्धिमनमुगतहिमेंमनदेत॥इछाभ
यक्रोधजोतजेमुक्तिपदारथलेत॥२८॥ ॥ओवी॥ ॥
॥इंद्रियबुद्धिमनजिंकिलें॥मुक्तिसाठींमनघातलें॥इच्छाभय
क्रोधत्यजिलें॥मुक्तपदपावला॥२८॥ ॥अभंग॥ ॥बुद्धीं
द्रियेंहीआकारा॥मनधरणेंसाधनबारा॥मुनिमोक्षाच्यामंदि
रा॥येकसरांचालिले॥१॥चाडनधरीसिद्धिची॥तेंविचकामना ॥११३॥
मोक्षाची॥जालामुक्तसव्यसाची॥पुनःपुनाकितिसांगु॥२॥

गी० पेंगाजन्माचेंसार्थक॥मातेंभासेहेंचयेक॥जाणुनितुकयाचा अ०
विवेक॥पदरींघेतीज्ञानये॥३॥२८॥ ॥श्लोक॥ ॥भोक्ता ॥५॥
रंयज्ञतपसांसर्वलोकमहेश्वरम्॥सुहृदंसर्वभूतानांज्ञात्वामां
शांतिमृच्छति॥२९॥ ॥सम०॥ ॥भोक्तायज्ञतपांचामी
सर्वलोकमहेशमी॥सर्वांचामींसखामातेंजाणोनीशांतिपाव
तो॥२९॥ ॥आर्या॥ ॥भोक्तायज्ञतपाचालोकेश्वरमी
चवेदवेदांती॥भूतांचासुहृदहिमीमातेंजाणूनिपावतीअंतीं
॥२९॥ ॥दोहरा॥ ॥तपजग्यनकोभोगतासबलोकनकें
ईश॥शांतिलहेजोजानिकेंमोकोंप्रभुजगदीश॥२९॥ ओवी॥
जपतपयज्ञांचाभोक्ता॥सर्वलोकांतईशकर्ता॥शांतिपावेजा
णतां॥सर्वांचासखाजाणमी॥२९॥ ॥अभंग॥भोक्ता
यज्ञतपाचामी॥आहेऐश्वर्यभूमी॥सर्वलोकींमहेशमी॥स
खातेंविसर्वांचा॥१॥ऐसाप्रभुचाअन्वय॥जालातेथेंअहंक्ष

य ॥ मग शांतिव धुप्राय ॥ तोपावतो निर्मळ ॥ २ ॥ तुकाविनवीवा
 रंवार ॥ माझ्यामतींहर्षफार ॥ संतींनकराचा अव्हेर ॥ प्राकृतभा
षाह्मणोनि ॥ ३ ॥ २९ ॥ ॥ इतिश्रीमद्भगवद्गीतायांश्रीकृष्णा
र्जुनसंवादेकर्मसंन्यासयोगोनामपंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥
वामन ॥ ॥ इतिटीकासमश्लोकीअध्यायापंचमावरी ॥ श्री
पार्थसारथीकर्त्ताजोंवामनमनोरथी ॥ ५ ॥ ॥ इतिगीतार्थ
बोधिन्यांश्रीमद्भगवद्गीताटीकायांपंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥

 श्रीगणेशायनमः ॥ ॥ वामन ॥ ॥ पूर्वाध्यायींअर्जुनाचाप्र
श्नकींश्रेयएकजें ॥ तेंसांगकर्मसंन्यासअथवाकर्मयोगचि ॥ १ ॥
श्रीकृष्णेंउत्तरदिल्हेंकींमाक्षार्थीतयासियां ॥ दोहींविणेंनव्हे सिद्
हेसापेक्षपरस्परें ॥ २ ॥ हेंघडेंसांख्ययोगासींकींत्यादोहींतयेकचि
अनुष्टितांसिधिपावेबोलिलींउभयत्रजे ॥ ३ ॥ सन्यासस्तुमहाबाहो
दुःखमाप्तुमयोगतः ॥ याश्लोकांतविनाकर्मबोलिलान्यासदुर्लभ
॥ ४ ॥ तयोस्तुकर्मसंन्यासात्कर्मयोगोविशिष्यते ॥ याश्लोकींकर्म
योगातेंश्रेष्ठदोहींतबोलिला ॥ ५ ॥ हेंतोंविरुध्दकींकर्मयोगाचीनी
चपायरी ॥ संन्यासज्ञानसिद्धीची सेवटीलीचपायरी ॥ ६ ॥ याचा
बोलुनियांभावविरोधपरिहारया ॥ अध्यायप्रथमारंभींकरीश्लो
कद्वयेंहरी ॥ ७ ॥ काम्यानांकर्मणांन्यासंसंन्यासंकवयोविदुः ॥ ऐ
सेंपुढेंबोलणारअध्यायींअठराविया ॥ संन्यासदोंपरीऐसाकीं
काम्यत्यागएकहा ॥ शिखासूत्रादिकत्यागन्यासआश्रमरूपतो ॥

॥९॥ निरग्नि आश्रमन्यासशुध्धचित्तास बोलिला ॥ कर्मयोगावि
णें जो कां पूर्वीं दुर्लभ वर्णिला ॥१०॥ टाकूनि कामसंकल्प कर्में कृ
ष्णार्पणें करी ॥ कर्मींच त्यास संन्यास साधे यास्तव थोर हा ॥११
अशुध्ध चित्त संन्यासी होतां भ्रष्टचि होइल ॥ निरग्नि मग तो कर्में
शुध्ध चित्त न हो शके ॥१२॥ तसाच जो क्रिया टाकी संन्यासपदवी
विना ॥ प्रत्यवायें बद्ध होतो उभय भ्रष्ट अक्रिय ॥१३॥ निरग्नि
हूनिही श्रेष्ठ कर्मयोग अशा गुणें ॥ अक्रिया हूनि हि श्रेष्ठ हें बोलेल
जगद्गुरु ॥१४॥ ॥**श्लोक**॥ ॥**श्रीभगवानुवाच**॥ ॥
अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः ॥ स संन्यासी च योगी च
न निरग्निर्न चाक्रियः ॥१॥ ॥**सम०**॥ ॥ कर्मीं फळासक्त न
व्हे करावें कर्म तें करी ॥ तो संन्यासी तोचि योगी न निरग्नि न अ
क्रिय ॥१॥ ॥**आर्या**॥ ॥ कर्मफळाचा आश्रय न करुनि जो
नर करीत निज धर्म ॥ तो संन्यासी योगी नेणें अग्नि क्रुअनग्नि तें व

र्म ॥१॥ ॥**दोहरा**॥ ॥ करम फल न चाहे नहि करम करे निःका
म ॥ जोगी संन्यासी वहहे पावत हे स्वधाम ॥१॥ ॥**ओवी**॥
कर्माचें फळ नापेक्षित कर्म करी ॥ तोचि संन्यासी योगी अवधारीं ॥
तो साग्नि कर्माचा अधिकारी ॥ तो कर्मयोगी न व्हे ॥१॥ ॥**अभंग**
पांडवासि विस्मय ॥ देव वदतां योगीराय ॥ आपणा ठावका अन्वय ॥
असावा हें वाटलें ॥१॥ मग पुसावें हा हेत ॥ कां कीं जेथें हरिप्रीत ॥ तें
च आपुलेंही हित ॥ हें तों कधीं टळेना ॥२॥ ऐसा भाव अंतरींचा ॥
जाणुनि सखा वदे वाचा ॥ ऐके पार्था संशयाचा ॥ मूळ ठावो फिटे
ल ॥३॥ आह्मी अंतरीं ठेविजे ॥ मग तें कोणासीं अर्पिजे ॥ ऐसें न भे
टेल दूजें ॥ पैं मायेचें आवडतें ॥४॥ अनन्यासींवंची जो कां ॥ होय
अधिकारी पातका ॥ असों कां ळजी स्फटका ॥ आजि जालें हें भा
ग्य ॥५॥ दाना योग्य तूं सत्पात्र ॥ जैसें कन्ये जोगें गोत्र ॥ अथवा
परमार्थीं श्रोत्र ॥ जैसा दीजे विरक्तीं ॥६॥ तरीं ऐके विचक्षणा ॥

गुजपेई अंतःकर्णा॥ अनश्रुत हे वासना॥ कर्मफळीं ज्या नाहीं॥
॥२॥ ॥७॥ करावें तें करीतो॥ तोच योगी संन्यासी तो॥ न निरग्नि ही जो हो
तो॥ अक्रिय तो नाहीं॥८॥ तुका वदे विचक्षणी॥ मांदुस गीतारत्न
खाणी॥ घ्यावें येके कनि वडुनि॥ वचनें शेषशायिचीं॥९॥१॥ ॥
॥श्लोक॥ ॥यं संन्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पांडव॥ न ह्यस
न्यस्त संकल्पो योगी भवति कश्चन॥२॥ ॥सम०॥ ॥संन्या
स जो ह्मणावा तो कर्मयोगचि पांडवा॥ कीं काम्यत्याग सन्यास क
र्मयोग न त्याविण॥२॥ ॥आर्या॥ ॥ज्या संन्यास ह्मणावें पार्था
त्यालाच योग तूं जाण॥ संन्यास त्यागाविण कोणी योगी न व्हे तुझी
आंण॥२॥ ॥दोहरा॥ ॥ज्याको संन्यासी हि कहत हे वहे जो
ग तूं जान॥ बिन संन्यास हि जोग नहि यह साच तूं मान॥२॥ओवी
ज्यातें संन्यासी ह्मणती॥ तो योग जाणे निश्चिती॥ संकल्प न टाकिला ॥२॥
किरीटी॥ तो योगी न व्हे॥२॥ ॥अभंग॥ ॥ह्मणावा जो संन्या

गी० सतो॥ कर्मयोग सिद्ध होतो॥ दोहीं मार्गें जे साजातो॥ येकाक्षेत्रा वंदा अ०
या॥१॥ कीया काम्याचे त्यागें॥ जो संन्यास घेतूं अंगें॥ कर्मयोग ही प्रसं ॥६॥
गें॥ न व्हे कांहीं दुसरा॥२॥ तुका विनवी भावार्थी॥ लोक परिसो परमा
र्थी॥ ज्या सप्रीत योगपंथीं॥ अहर्निशीं अखंड॥३॥२॥ श्लोक॥
आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते॥ योगारूढस्य तस्यैव शमः
कारणमुच्यते॥३॥ ॥सम०॥ ॥योगारुरुक्षु जो ज्ञानी कर्म
त्यास हि कारण॥ तयाच योगारूढासीं ध्यानस्थिति स कारण॥३॥
॥आर्या॥ ॥योगारुरुक्षु मुनि जो पार्था कारण तयासि तें कर्म॥
योगारूढ मुनीला कारण शम तोचि दे महाशर्म॥३॥ ॥दोहरा॥
जो करम तें लहत हे ग्यानी चीत्त बिचार॥ जोग हि लहे शांति हि गये बि
खे बिंद्रियन मार॥३॥ ॥ओवी॥ ॥योगारूढ जो इच्छित॥ त
या कर्म हें निभ्रांत॥ योग पावल्या शांत॥ शम बुद्धि तोची॥३॥अभं०
योगारूढ जो कां ज्ञाता॥ जगीं व्हावया मान्यता॥ संपादित आमुची

वार्त्ता ॥ पैं गाजीवीं धरूनी ॥ १ ॥ कर्मत्यासही पांडवा ॥ कारण होय
॥३॥ यागोरवा ॥ जेसें तें लव लें दिवा ॥ प्रभादावी अनंत ॥ २ ॥ तयायो
गारूढा लागीं ॥ ध्यानस्थित कारण आंगीं ॥ पुढें उजळी हे सांगी ॥
तुकयाकारागीर तो ॥ ३ ॥ ३ ॥ ॥ **श्लोक** ॥ ॥ यदा हि नेंद्रिया
र्थेषु न कर्मस्वनुषज्जते ॥ सर्वसंकल्पसंन्यासी योगारूढस्तदो
च्यते ॥ ४ ॥ ॥ **सम॰** ॥ ॥ जेव्हां न विषयीं गुंते कर्मीं ही न रुते
मन ॥ भोगसंकल्प ही टाकी तेव्हां आरूढ बोलिजे ॥ ४ ॥ **आर्या** ॥
जेव्हां कुंतीतनया टाकुनि संकल्प जाळभा रूढ ॥ कर्मीं आणि कवि
षयीं उदास जो तो चियोग आरूढ ॥ ४ ॥ **दोहरा** ॥ ॥ बिखयन
सों और करमसों होय प्रीत जब दूर ॥ सब संकल्प न कों तजे जोगर
हेत बपूर ॥ ४ ॥ ॥ **ओवी** ॥ ॥ इंद्रियार्थी जाला हीन ॥ कर्मीनि
पजोरा हे आपण ॥ तयासी संन्यासी ह्मणो न ॥ योगारूढ बोलि ॥३॥
जे ॥ ४ ॥ ॥ **अभंग** ॥ ॥ जेव्हां न विषयीं करा ॥ गुंते देवी

गी॰ क संपदा ॥ तुज सांगतों प्रमदा ॥ लाघव जेसें शुकासी ॥ १ ॥ कर्मीं अ॰
हीन रुते मन ॥ जेसें श्रीपादास्वप्न ॥ जाला गज वाजी वाहन ॥ जागा ॥६॥
होतां तें मिथ्या ॥ २ ॥ टाकी भोगाचे संकल्प ॥ गेला जीवींचा विकल्प
तेव्हां आरूढ ज्ञानदीप ॥ बोलतो तुकया ऐसें ॥ ३ ॥ ४ ॥ ॥ **श्लोक**
उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ॥ आत्मैव ह्यात्मनो बंधुरा
त्मैव रिपुरात्मनः ॥ ५ ॥ ॥ **सम॰** ॥ ॥ उद्धरावें स्वचित्ता लाप्र
पंचीं बुडऊं न ये ॥ मित्र हें आपुलें चित्त शत्रु ही चित्त आपुलें ॥ ५ ॥ ॥
॥ **आर्या** ॥ ॥ उद्धरिजे अपअपणा करिजे अपुला न घात आहो
तो ॥ मित्र हि अपुला आपण पार्था अपुला चि शत्रु ही होतो ॥ ५ ॥ ॥
॥ **दोहरा** ॥ ॥ निज आतमकूं उध्धरत अधोगमन करे हेत ॥ आ
तमा ही रिपु आपनकों आतमा ही सुख देत ॥ ५ ॥ ॥ **ओवी** ॥
निज आत्मा उध्धरत ॥ उद्योगावांचूनि मन ठेवित ॥ आपला शत्रु आ
पण जाणत ॥ मित्र आपुलें चित्त पें ॥ ५ ॥ ॥ **अभंग** ॥ ॥ अरे

विषयडोहांत ॥जेकांबुडालेंसंतत॥ तेंतंवउध्दरावें चित्त॥आत्मब
॥४॥ ळेंअभ्यासें॥१॥ नयेबुडऊं प्रपंचीं॥पुढेंजाणिवगेल्याचीं॥कोण
पुसेधनवंताची॥लाजजाय धनगेल्या॥२॥ मित्रहें आपुलें चित्त॥
साह्यजाल्या फळदेत॥ शत्रु हिहेंच होत॥ हाउध्दरूनि अनर्थ॥३॥
तुकाह्मणे सर्वाधिक॥साधनहें चि गमे येक॥ चित्तजाल्या प्रसन्नसु
ख॥ कायउणें लाभासीं॥४॥५॥ ॥श्लोक॥ ॥बंधुरात्मा
त्मनस्तस्य येनात्मैवात्मनाजित:॥ अनात्मनस्तु शत्रुत्वेवर्तेता
त्मैव शत्रुवत्॥६॥ ॥सम०॥ ॥मित्र त्याचेंच तें चित्तजें
स्वरूपें चि जिंकिलें॥अनात्मज्ञास शत्रुत्वें वर्त्ते चित्त चि शत्रु वत्॥६
॥आर्या॥ ॥जिंकी मनजो त्याचें मानस तें आत्मबंधु हित क
रतो॥ मानस अनात्मयाचें हातें अपुला रिपू हितो करतो॥६॥
॥दोहरा॥ ॥आपहि जित्ये आतमा सोई बंधु याहि॥ जिनजीं ॥४॥
त्यो नहिंऊ वहे अरहे बरततताहि॥६॥ ॥ओवी॥ बंधुरात्मा

गी० चित्त जिंतोनी॥ तें चित्त बंधू जाणोनी॥ स्वरूपीं वोळखी नाणी॥ चि अ०
त्त शत्रुवतू वर्ते॥६॥ ॥अभंग॥ ॥ मित्र चित्त तें ह्मणावें॥जें ॥६॥
कां स्वरूपीं विसावें॥ विश्वरूप अनुभवें॥ जिंकी स्वात्म मतीने॥१॥
हें कां अलभ्य साधन॥ विधि इंद्र चंद्रेशान॥ मानवती ऐसा मान॥ पें
भोगीतें निवाडे॥२॥ नाहीं तरी अज्ञानांत॥ मिथ्यां भवसिंधु दावीत॥
तुकांह्मणे र्जावभ्रांत॥ होय शत्रु हें झाल्यां॥३॥६॥ ॥श्लोक॥
जितात्मन: प्रशांतस्य परमात्मा समाहित:॥ शीतोष्णसुखदु:खे
षु तथा मानापमानयो:॥७॥ ॥सम०॥ ॥शांताचें जित चि
त्ताचें थोर चित्त वरें स्थिर॥ मानापमानीं शीतोष्णीं सुखदु:खांत
जें सम॥७॥ ॥आर्या॥ ॥निजमन शांतात्मा जो त्याचा
आत्मा भवार्णवांत तरे॥ शीतोष्णीं सुखदु:खीं मानामानीं अ
से समाहित रे॥७॥ ॥दोहरा॥ ॥जिन जित्यो है आतमा
शांति लहे बहु ग्यान॥ शीत उष्ण सुखदु:ख जरा और मान अप

मान ॥७॥ ॥ओवी॥ ॥ मन जिणोनि शांति पावे ॥ तथा पर
॥५॥ निष्ठा जाणावें ॥ ऐसी यासि सुखदुःख न पावे ॥ तेसेंच मानापमा
न ॥७॥ ॥अभंग॥ ॥ अरे शांताचें कुरुपती ॥ जितचित्ता
ची आयती ॥ थोरपण हे निगुती ॥ चित्त थोरे स्वरूपीं ॥१॥ त्या
चें चिन्ह हेची वीरा ॥ मान अपमान चारा ॥ झगटल्या या शरीरा
मेरु ऐसी धैर्यता ॥२॥ तेसेंच शीतउष्ण ॥ विषामृता जेसा कृष्ण
सुखदुःखीं तो सहिष्ण ॥ तुकयाच कोने दीजे ॥३॥७॥ ॥
॥श्लोक॥ ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेंद्रियः ॥ यु
क्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकांचनः ॥८॥ ॥सम०॥
ज्ञानें अनुभवें तृप्त जो कूटस्थ जितेंद्रिय ॥ तो योगारूढ कीं हेम
भेंडा धोंडा जया सम ॥८॥ ॥आर्या॥ ॥ जो कूटस्थ जि
तेंद्रिय विज्ञान ज्ञान तृप्तिनें धाला ॥ ढेंकुळ धोंडा सोनें ज्या सम ॥५॥
तो युक्त मान्य विबुधाला ॥८॥ ॥दोहरा॥ ॥ज्याने ग्या

न विग्यान जो और विंद्रि जित होय ॥ सो नो पाखान एक सम गने सो अ०
जोगी होय ॥८॥ ॥ओवी॥ ॥ ज्ञान विज्ञान तृप्त जाले ॥ अवि ॥६॥
नाश विषय गेले ॥ जयां सुवर्ण मृतिका हे न कळे ॥ ते योगी जाणतूं ॥
॥८॥ ॥अभंग॥ ॥ज्ञान भोज्य गुरू हातें ॥ धाला जेउनी तृ
प्तितें ॥ सुखें उद्गार अवचितें ॥ पैं गादे तूं सर्वदा ॥१॥ जितेंद्रिय ब्रह्म
चारी ॥ राहे कूटस्थ व्यापारीं ॥ भासे न भासे अंतरीं ॥ ज्याचा अंत
अढळे ना ॥२॥ तोच योगारूढ हेम ॥ भेंडा धोंडा जया सम ॥ तुका ह्म
णे सर्वोत्तम ॥ हे रोकडी प्रतिती ॥३॥८॥ ॥श्लोक॥ ॥ सुहृ
न्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबंधुषु ॥ साधुष्वपि च पापेषु सम
बुद्धिर्विशिष्यते ॥९॥ ॥सम०॥ ॥ मित्र शत्रु उदासीन म
ध्यस्थ असखे सुखे ॥ साधु पापीं अशां सर्वी समबुद्धि विशेषतो ॥
॥९॥ ॥आर्या॥ ॥ द्वेष्य उदासीन रिपू बंधू मध्यस्थ सुहृ
द आणि मित्र ॥ साधू पापी याला पाहे सम तो विशिष्ट सर्वत्र ॥९॥

॥दोहरा॥ ॥मित्रउदासीशत्रुपुनिऔरनिजबंधुसमान॥
॥६॥ साधुपापिचित्तमेंगनेएकउनमान॥९॥ ॥ओवी॥ सोयरे
बंधुमित्रजन॥वैरीसखाउदासीन॥यातेंमानीसमान॥तोस
मबुधी॥९॥ ॥अभंग॥ ॥कोणीकापिलीयामान॥
दुःखेंनपवेरुदन॥मित्रजोडेराजश्रुन॥गजचाहनींमीरवी॥
॥१॥ दोन्हीसारिखेजयासीं॥तैसेंचित्तसख्यापासीं॥घेतनि
त्यविसाव्यासीं॥असखाहितेविंच॥२॥ साधुबोधामिथ्या
बोली॥समबुद्धिपूजाकेली॥तुकाह्मणेज्ञानवल्ली॥त्याची
जालीसफळ॥३॥९॥ ॥श्लोक॥ ॥योगीयुंजीतसतत
मात्मानंरहसिस्थितः॥एकाकीयतचित्तात्मानिराशीरपरि
ग्रहः॥१०॥ ॥सम०॥ ॥कर्मयोगींचित्तयोजीसदाएकां
तसेउनी॥स्थिरचित्ततनूएकटाकीआशापरिग्रह॥१०॥ ॥ ॥६॥
॥आर्या॥ ॥जोसंयमचित्तात्मापार्थानिष्कामसंचयत्या

गी० गी॥येकांतींएकाकीब्रह्मींयोजीमनासजोयोगी॥१०॥ ॥दोहरा॥ अ०
बैठेकेसएकचित्तजोगीसाधेजोग॥एकाकीचाहेनकछुजोरेनहिस ॥६॥
खभोग॥१०॥ ॥ओवी॥ ॥योगीयेकांतींबैसोनी॥असावें
रहस्यध्यानीं॥चित्तआत्माजिंतोनी॥टाकीआशापरिग्रह॥१०
॥अभंग॥ ॥कर्मयोगींचित्तयोजीसदोदित॥जेसायोगीघेत
दिव्यरस॥१॥ येकांतसेवनआवडतेंमन॥पथ्यानेलोटुनशाहा
णाचागे॥२॥स्थिरचित्तेंचिंतींयेकजगत्पती॥सद्विद्यासप्रीतीअ
नुरागें॥३॥टाकीअशातेसापरिग्रहवीरेशा॥नाहींजीवदशातु
काह्मणे॥४॥१०॥ ॥श्लोक॥ ॥शुचौदेशेप्रतिष्ठाप्यंस्थिर
मासनमात्मनः॥नात्युच्छ्रितंनातिनीचंचैलाजिनकुशोत्तरम्॥
११॥ ॥सम०॥ ॥स्थांपूनियांशुध्यदेशींस्थिरआसनआ
पुलें॥नबहूउंचनानीचकुशचर्मावरीपट॥११॥ ॥आर्या॥
शुध्यस्थानींआपुलेंस्थिरआसनघालुनीसयोगरते॥अत्युच्च

नीचहि नजें वस्त्राजिनदर्भज्यांतउत्तरतें ॥ ११ ॥ ॥दोहरा॥ ॥
॥७॥ ठेरपुनित निहारकेंकरी आसन विस्तार ॥ नहीऊंचो निचो नहीप
टकुशाचर्मविथार ॥ ११ ॥ ॥ओवी॥ ॥ पवित्रशुधदेशींजा
ण ॥ स्थिरकरावें आसन ॥ उंचनीच नसावेंजाण ॥ कुशाचर्मआं
थरोनी ॥ ११ ॥ ॥अभंग॥ ॥ स्थापूनियां शुधदेशीयें प्रसि
ध ॥ प्रयागअंबुधसंतग्राम ॥ १ ॥ स्थिरहें आपुलें आसनजेणें
केलें ॥ बहुउंचलले ऐसेंनको ॥ २ ॥ नीचतरीं भूमीदोषलागेउर्मी
कुशमृगचर्मीपटदिव्य ॥ ३ ॥ तेथेंरू मुहुर्तेंबेसावें निरुतें ॥ अठ
वीगुरुतेंतुकाह्मणे ॥ ४ ॥ ११ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तत्रैकाग्रंमनः
कृत्वा यतचित्तेंद्रियक्रियः ॥ उपविश्यासने युंज्याद्योगमात्मवि
शुधये ॥ १२ ॥ ॥सम०॥ ॥ करूनिमनएकाग्रस्थिरचित्तें
द्रियक्रिया ॥ चित्तशुध्यर्थयोजावा योगबेसोनिआसनीं ॥ १२ ॥ ॥७॥
॥आर्या॥ ॥ त्या आसनिंबेसोनी करुनी एकाग्रधीरचित्तमुनी

गी० आत्मविशुधीसाठीं योजावा योगइंद्रियेंदमुनी ॥ १२ ॥ दोहरा॥ अ०
करीबेठे मनकों थीर सबबिंद्रियनकोंजीत्त ॥ करिकेंआतमशुधकों ॥६॥
जोगकरे यारीत ॥ १२ ॥ ॥ओवी॥ ॥ मनइंद्रियेंचित्तनेमुनी॥
बेसावेंतयेआसनीं ॥ आत्मशुधीव्हावयालागोनी ॥ योगकरावा॥
॥ १२ ॥ ॥अभंग॥ ॥ करुनीमानसएकाग्रहव्यास ॥ नेदीबा
ह्यपेसमनाघेवो ॥ १ ॥ स्थिरचित्तहोयइंद्रियांसक्रिया ॥ चोळंगती
पायासदोदीत ॥ २ ॥ चित्तशुध्यर्थाचा योगपेंहटाचा ॥ जयोआसा
नाचातुकाह्मणे ॥ ३ ॥ १२ ॥ ॥श्लोक॥ ॥ समंकायशिरोग्री
वंधारयन्नचलंस्थिरः ॥ संप्रेक्ष्यनासिकाग्रंस्वंदिशश्चानवलो
कयन् ॥ १३ ॥ ॥सम०॥ ॥ माजपाठशिरग्रीवानीटहेंधरुनी
स्थिर ॥ ठेऊनिदृष्टिनासाग्रीं न पाहाव्यादिशा दश ॥ १३ ॥ आर्या
कायशिरग्रीवातें समअचळकरूनिनासाग्र ॥ पाहुनिदिशानपा
हुनि करुनीब्रह्मींमनासएकाग्र ॥ १३ ॥ ॥दोहरा॥ कायाशि

रओरग्रीवकोंराखेएकसमान॥दृष्टिधरेनिजनाशिकादेखनहि
दिशआन॥१३॥ ॥ओवी॥ ॥कायासमकरोनिकटीहनव
टी॥दृष्टिदीजेनासापुटीं॥स्थिरकीजेश्वासाचीपरिपाठी॥दिशाअ
वलोकननकरावें॥१३॥ ॥अभंग॥ ॥माजपाठशीरग्री
वानीटस्थीर॥धरुनीनि॑धीरस्थिरकीजे॥१॥उठतांउपाधीते
शादेहींआधी॥गिळीजेअंबुधिनदाजैसा॥२॥आवरोनिमना
धरीजोधारणा॥तुकाह्मणेजाणायोगियातो॥३॥१३॥
॥श्लोक॥ ॥प्रशांतात्माविगतभीर्ब्रह्मचारिव्रतेस्थितः॥मनः
संयम्यमच्चित्तोयुक्तआसीतमत्परः॥१४॥ ॥सम०॥ ॥
मननिर्भयजोशांतब्रह्मचारिव्रतस्थजो॥मद्रूपींलाउनीचित्तब
सेमत्परहोउनी॥१४॥ ॥आर्या॥ ॥मजवरिमनज्याचेंत्या
शांतात्म्याचेंसमूळभयपरतो॥सब्रह्मचर्यरतजोयुक्तअसो
मनदमूनिमत्परतो॥१४॥ ॥दोहरा॥ ॥शांतगहेभयकों

तजेब्रह्मचर्यव्रतलेत॥मोमेंराखेरोंकेमनलहेज्योगकोंभेद॥१४॥
॥ओवी॥ ॥निर्मळमनेकरूनी॥निर्भयमनींहोउनी॥ब्रह्मच
र्यआचरोनी॥मजसांनिध्यहोईजे॥१४॥ ॥अभंग॥ ॥
असेसर्वकाळचित्तासिनिरखळ॥योजुनीप्रबळनिर्भयजो॥१॥शां
तमतीकर्णेजीतीअंतःकर्णें॥व्रतनिर्मळपणेंआचरेहें॥२॥चित्ता
सिमद्रूपींलाउनिनिक्षेपी॥वसेस्वस्वरूपींमत्परजो॥३॥तुकाह्म
णेतेथेंसिध्दीस्वसामर्थ्यें॥येतांयोगीनाथेंनपाहणें॥४॥१४॥ ॥
॥श्लोक॥ ॥युंजन्नेवंसदात्मानंयोगीनियतमानसः॥शांतिं
निर्वाणपरमांमत्संस्थामधिगच्छति॥१५॥ ॥सम०॥ ॥
ऐसेंसदाचित्तयोजीयोगीआवरुनीमन॥मोक्षासिसाधनअसी
माझीतोशांतिपावतो॥१५॥ ॥आर्या॥ ॥नियमुनिचित्त
ब्रह्मींयोजीजैसासदैवजोयोगी॥मद्विषयाजेपरमातेहेनिर्वाण
शांतितोभोगी॥१५॥ ॥दोहरा॥ ॥इहबिधिकरेजोजोग

कों निजमन कों थिर राख॥ शांति लहें मो कों मिले रहे अभीर सचाख
॥९॥ ॥१५॥ ॥ओवी॥ ॥ चित्त ठेवी माझे ठाईं॥ मी निज स्वरूप पाहीं॥
समाधि होउं निराही॥ मज तत्पर अर्जुना॥१५॥ ॥अभंग॥ ॥
एवं चित्त ऐसें योजुनी विन्यासें॥ मन हातीं नेसें आकळावें॥१॥ मोक्षा
अधिकारी होय निर्विकारी॥ शांति देवावरी श्रीकृष्णाची॥२॥ तुकाह्म
णे येथें संशयी अनाथ॥ पडती त्या पंथ लावी देव॥३॥१५॥ श्लोक
नात्यश्नतस्तु योगोऽस्ति नचैकांतमनश्नतः॥ नचातिस्वप्नशीलस्य
जाग्रतो नैव चार्जुन॥१६॥ ॥सम०॥ ॥ न योग बहु खातांही
न एकाग्रत्व लंघनीं॥ न बहू निजतां नित्य जागतां ही न अर्जुना॥१६॥
॥आर्या॥ ॥ केवळ उपवासाला योग न कों आणि फार खात्याला
जागे फार निजे ही कों तेया योग पार खात्याला॥१६॥ ॥दोहरा॥
जोग लहे नहि बहु भके नहि बिन खाये मीत॥ सोवते हि सोवे न हिं अति ॥९॥
जागत नहिं नीत॥१६॥ ॥ओवी॥ ॥ सदा मनलक्षी असतां॥

गी० न ये बहु खातां॥ उपोषण न करितां॥ न जागतां अर्जुना॥१६॥ ॥ अ०
॥अभंग॥ ॥ नव्हे योग ऐसा खावें बहु तैसा॥ लंघनें भरवंसा जा ॥६॥
य सारा॥१॥ बहू झोंप घेणें योगाचीं लक्षणें॥ नव्हति कीं जागणें चिर
जेथें॥२॥ अर्जुना तूं जाण योगाचें प्रमाण॥ अंतरिंची खूण आह्मी
सांगों॥३॥ तुकाह्मणे देवो कृपाळू पाहावो॥ योगाचा बोलावे आतुव
डी॥४॥१६॥ ॥श्लोक॥ ॥ युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य क
र्मसु॥ युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा॥१७॥ ॥सम०॥
विहार आहार चेष्टा कर्मीं निद्रा प्रबोध ही॥ युक्त ज्याचीं तया साधे यो
ग जो दुःखनाशक॥१७॥ ॥आर्या॥ ॥ आहार विहार नियत
करितो कर्मीं हि नेमिल्या चेष्टा॥ फार न जागे न निजे योग तया सौख्य
दे कुरुश्रेष्ठा॥१७॥ ॥दोहरा॥ ॥ जुगत आहार बिहार जो क
रम जोग पुनि होय॥ जागत सोवत जुगत सों सो डारत दुख धोय॥
॥१७॥ ॥ओवी॥ ॥ अति आहार न साचा॥ कर्मीं बोध असा

या॥बुद्धिवंतेंसाधाया॥ योगदुःखनाशक॥१७॥ ॥अभंग॥ ॥
॥१०॥ युक्तिनेवागीजेसिण नआणीजे॥ आहार घेईजे स्वल्पु तैसा॥१॥
चेष्टा कर्मरत्नें युक्तिचीपचिवें॥ जाणीजे स्वतंत्रेंजाणतेनी॥२॥नि
द्राकिंवाजागायेथेंमहाभागा॥युक्तिभुस्थगंगापाहिजेग्ग॥३॥तया
सींहादुःखनासोनीदेरूरव॥तोयोगुपैंचोरवतुकयालाभे॥४॥१७
॥श्लोक॥ ॥यदाविनियतंचित्तमात्मन्येवावतिष्ठते॥निस्पृहः
सर्वकामेभ्योयुक्तइत्युच्यतेत्तदा॥१८॥ ॥सम०॥ ॥आत्म
स्वरूपींचचित्तराहेजेव्हांनियोजिलें॥सर्वकामस्पृहाशून्यह्मणा
वासिध्दतेंधवां॥१८॥ ॥आर्या॥ ॥जेव्हांब्रह्मींच्यवसेज्याचें
नियमितसदैवअंतरतो॥निस्पृहकामींतेव्हांयुक्तह्मणावारूरवा
नअंतरतो॥१८॥ ॥दोहरा॥ ॥जबनिजचित्तकोंरोकिकेंरा
खेआतममांह॥तजेसबेजोकामनासोजोगीनरनाह॥१८॥ ॥ ॥१०॥
॥ओवी॥ ॥युक्तआहारस्वल्प॥कर्मचेष्टाकरीअल्प॥रूषु

गी० प्तिअसेनेमस्त॥सिध्दतेव्हांखरा॥१८॥ ॥अभंग॥ ॥आत्मरूपीं अ०
चित्तरमेसदोदित॥निस्पृहसंतृप्तरूपाघन॥१॥कामहोयशून्यगति ॥६॥
तेअनन्य॥पाहतांअमान्यनहोआह्मी॥२॥सिध्दऐसेंत्यातेंह्मणावें
सर्वार्थी॥ऐसेंरमानाथेंवर्णियेलें॥३॥ध्यानकेसेंकीजेतेंश्रोत्रींघई
जे॥तुकाह्मणेमाझेंहीतऐका॥४॥१८॥ ॥श्लोक॥ ॥यथादीपो
निवातस्थोनेंगतेसोपमास्मृता॥योगिनोयतचित्तस्ययुंजतोयोगमा
त्मनः॥१९॥ ॥सम०॥ ॥निवातसदनींदीपनहालेउपमाअ
सी॥चित्तासयोगियाच्याजोस्वात्मयोगासियोजितो॥१९॥ ॥
॥आर्या॥ ॥जोआत्मयोगयोजीजितमनज्याचाहिकामरिपुमे
ला॥तोसद्योगीपावेरूस्थिरनिर्वातदीपउपमेलो॥१९॥दोहरा॥
जेसोदीपसमिरबिनरहेजोतटहराय॥जोगीनिश्चलचित्तसोंउप
माहेयाभाय॥१९॥ ॥ओवी॥ ॥चित्तनेमिलेअसे॥केवळ
आत्माचिदिसे॥निर्वाहतसदनींदीपअसे॥तेसीउपयोगीयासी॥१९॥

॥अभंग॥ ॥निर्वातसदनींदीपउपमेनी॥चंचळ आसनींहोऊंनये
॥१॥ योगियाचेंचित्तमिळेऐकाशांत॥नजळाहेमांतयेकविध॥२॥ किंवा
पतिव्रता आलिंगीतकांता॥वियोगाचीवार्त्तासहजराहे॥३॥ तुकाह्मणे
घनदृष्टिधरासन॥तेसेयोगीमनस्थिरावलें॥४॥१९॥श्लोक॥ ॥
यत्रोपरमतेचित्तंनिरुद्धंयोगसेवया॥यत्रचैवात्मनात्मानंपश्यन्ना
त्मनितुष्यति॥२०॥ ॥सम०॥ ॥जेथेंउपरमेचित्तयोगमार्गें
निरोधिलें॥जेथेंचित्तेंआत्मयातेंपाहेतोषेतयांतचि॥२०॥आर्या॥
जेथेंउपरमपावेयोगनिरुध मननिजसुखेंपुष्ट॥जेथेंआपणअप
णांपाहुनिअपुल्याचठाइंसंतुष्ट॥२०॥ ॥दोहरा॥ ॥जोगी
सेवतजोगकोंचित्तजहांठहराय॥निरखतआतमकोंतहारहतस
दांसुखताय॥२०॥ ॥ओवी॥ ॥चित्तनेमिलेंअसें॥आ
त्माकेवळदिसे॥जेथेंआत्मावसे॥संतोषपाहे॥२०॥अभंग॥
जेथेंउपरमेंचित्तयोगप्रेमें॥सहजदेहधर्मेंसांडवला॥१॥ योगाचि

यापंथेंनिरोधीसर्वार्थ॥उसंतपेंजेथेंविरामले॥२॥जेथेंआत्मा
मीळेचित्तानंदमेळें॥अखंडितखेळेनिरामयीं॥३॥ पाहातोषद
पदजेंचीअरविंद॥तुकाह्मणेनादमुरेठाईं॥४॥२०॥ ॥श्लोक॥
सुखमात्यंतिकंयत्तद्बुद्धिग्राह्यमतींद्रियम्॥वेत्तियत्रनचैवायंस्थित
श्चलतितत्त्वतः॥२१॥ ॥सम०॥ ॥तेथेंअनंतसुखजेंबुद्धिग्रा
ह्यअतींद्रिय॥जाणेत्यातेंमगनहातत्त्वापासूनियांचळे॥२१॥ ॥
॥आर्या॥ ॥बुद्धिग्राह्यअतींद्रियआत्यंतिकसौख्यजेंतयाजा
णे॥जेथेंसुस्थिरहोतांतत्त्वापासुन्नहोतसेंजाणें॥२१॥दोहरा॥
जोसुखबिंद्रियनतेंपरेंबहुत्तबुध्दिकरलेत॥वासुखकोंजानेसबें
तापछेहेनीत॥२१॥ ॥ओवी॥ ॥अतिसुखजेंअनुभवेंक
रूनी॥इंद्रियांअगोचरबुध्दिज्ञानेंजाणोनी॥जोस्थिरदृढआपुलें
मनीं॥तोनचळेकांहींनिश्चितं॥२१॥ ॥अभंग॥ ॥नसेअं
तत्यासअनंतह्मणावें॥सुखानेमिळावेंऐसेठाईं॥१॥बुद्धिदृढध

रीतेसींचइंद्रियें॥ दमीयोगराययोग्याचातो॥२॥जाणेत्यातेंमगतो
॥१२॥ ह्माकरितांकर्म॥ वृत्तीसजोधर्मचलोनेदी॥३॥ पाउलेंपांथिकजेसीं
उपेक्षीना॥तुकाह्मणेमनाधरुनीयागे॥४॥२१॥ ॥श्लोक॥ ॥
यंलब्ध्वाचापरंलाभंमन्यतेनाधिकंततः॥ यस्मिन्स्थितोनदुःखेन
नगुरुणाऽपिविचाल्यते॥२२॥ ॥सम०॥ ॥नमानीलाभ
अधिकत्यासुखाहुनिआणखी॥ नचळेथोरदुःखेंहीपावतांज्यासु
खींस्थिती॥२२॥ ॥आर्या॥ ॥ज्यालाभातेंपाउनिलाभन
मानीदुजाअधिकमगतो॥जेथेंस्थिरमनकरितांमोठ्यादुःखेंहि
तोनडगमगतो॥२२॥ ॥दोहरा॥ ॥जापायेलाभनअधि
कओरजानरेमीत॥थिरतागहिडोलेनहिबहुदुःखपायेचित्त॥
॥२२॥ ॥ओवी॥ ॥यापरताआणीकनाहीं॥त्याहूनअधि
कनमानीकांहीं॥ राहूनिसुखाचेंठाईं॥ अत्यंतदुःखेंनचळे॥२२ ॥१२॥
॥अभंग॥ ॥नमानीतोलाभआणखीत्याहूनी॥जीवासमा

गी० धानअखंडित॥१॥ज्यासुखाचीगतीहातासआलीया॥मगकष्टजा अ०
लियानेघेजीचीं॥२॥आधिव्याधिरोगराजक्षोभजाला॥तुकाह्मणे ॥६॥
त्यालाआठवेना॥३॥२२॥ ॥श्लोक॥ ॥तंविद्याद्दुःखसंयोग
वियोगंयोगसंज्ञितम्॥सनिश्चयेनयोक्तव्योयोगोऽनिर्विण्णचेतसा
॥२३॥ ॥सम०॥ ॥दुःखसंयोगवृत्तीचातद्वियोगांतआयता॥
चित्तात्मयोगतोयत्नेंसाधावादृढनिश्चयें॥२३॥ ॥आर्या॥ ॥
दुःखाचालेशनसेज्यांतहितोयोगपांडवाजाण॥सुविरक्तेंयोजावानिः
संशयहाचियोगनिर्वाण॥२३॥ ॥दोहरा॥ ॥दुःखहुकेसं
जोगकोंमानलेतवियोग॥निश्चयकरिकेंजोगकरेताकूंकहतजु
जोग॥२३॥ ॥ओवी॥ ॥जेथेंदुःखसंबंधनाहीं॥तोचियोग
जाणावानिश्चितपाहीं॥वैराग्ययुक्तअंतःकरणकरूनिराहीं॥यो
गाभ्यासीं॥२३॥ ॥अभंग॥ ॥दुःखसंयोगाचीधुळीआं
गानलगे॥नभजेसेंउबगेंवज्रघायें॥१॥ बुध्दियोगींकेसीपाण्यां

तमासोळी॥ मगतळमळी पार्थाकोण॥२॥ चित्तआत्मरूपीं राहे
॥१३॥ सर्वकाळ॥ ऐसाप्रेलेंबळ स्वीकारीतू॥३॥ निश्चयसदृढें ऐसाच
साधावा॥ तुकाह्मणेदावायमनकरी॥४॥२३॥ ॥श्लोक॥ ॥
संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वासर्वानशेषतः॥ मनसैवेंद्रियग्रामंवि
नियम्यसमंततः॥२४॥ ॥सम०॥ ॥ संकल्पकरितांजालेका
मतेसर्वटाकुनी॥ मनेंचिइंद्रियग्रामदंडुनिसकळांस्छळीं॥२४॥
॥आर्या॥ ॥ संकल्पेंजेउठतीपार्थातेंसर्वकामसांडावे॥ सर्वचइं
द्रियाचाचित्तेंगणदमुनियोगमांडावे॥२४॥ ॥दोहरा॥ संक
ल्पनजोकामनातिन्हेंतजेचित्तचाय॥ मनसोंरोकेंबिंद्रियनजोगकरे
याभाय॥२४॥ ॥ओवी॥ ॥ संकल्पमात्रेंचिजाले॥ कामतें
सर्वटाकिले॥ मनेंइंद्रियग्रामधरिले॥ दंडूनियांसर्वत्र॥२४॥ अभंग
संकल्पकरितांकामांतें त्यागुनी॥ श्रुतिअनुष्ठानीसर्वत्यागें॥१॥ ॥१३॥
मनस्वीखेळतोविषयद्वारींखळ॥ कर्णग्रामबळभंजीछंदें॥२॥ स

गी० वंठाईदंडमनाहातीदिल्हा॥ कील्हाचाबेसलारामजपीं॥३॥ तुका अ०
ह्मणेगोष्टीफुकटनसाधे॥ विरळाकोटिमध्येंयोगीरावो॥४॥२४॥ ॥६॥
॥श्लोक॥ ॥ शनैःशनैरुपरमेद्बुद्ध्याधृतिगृहीतया॥ आत्मसं
स्थंमनःकृत्वानकिंचिदपिचिंतयेत्॥२५॥ ॥सम०॥ ॥धा
रणायुक्तबुद्धीनेंव्हावेंस्थीरहळूहळू॥ योजूनिचित्तचिन्मात्रींकांहीं
चिंतूनयेमग॥२५॥ ॥आर्या॥ ॥ धैर्येंवळउनिमतिलाहळू
हळूउपरतीसजिंकावें॥ब्रह्मींस्थिरमनकरुनीकांहींमगपांडवान
चिंतावें॥२५॥ ॥दोहरा॥ ॥ धीरजधरीओरबुद्धिकरेरहेहरे
सबत्याग॥ कछुकरेनहिकामनाआतमसोंअनुराग॥२५॥ ॥
॥ओवी॥ ॥ बुध्दिकरूनिधारणेनें॥ हळुहळुस्थिरकरीमन॥ चि
न्मात्रींयोजीचित्तालागुन॥ मगकांहींचिंतूनये॥२५॥ अभंग॥
धारणायुक्तिगुरुमुखेंसाधी॥ सहजसमाधीप्राप्तहोय॥१॥ नव्हे
गाढमूढलोकरंजवणें॥ तठस्थतायेणेदेहावरी॥२॥ तारस्थ्यते

नाम समाधी बोलती ॥ उघड फजीती जनामध्यें ॥ ३ ॥ येथें स्वरूपांत
 प्रवेश हळु हाळु ॥ स्थिर मन मेळु चिन्मात्रींच ॥ ४ ॥ कांहीं न चिंतावें मग
पेठा जाल्या ॥ तुका ह्मणे आल्या तिन्ही लोक ॥ ५ ॥ २५ ॥ श्लोक ॥ ॥
यतो यतो निश्चरति मनश्चंचलमस्थिरम् ॥ ततस्ततो नियम्यैतदात्म
न्येव वशं नयेत् ॥ २६ ॥ ॥ सम० ॥ ॥ ज्या ज्या पदार्थीं निघतें म
न चंचल अस्थिर ॥ तेथें तेथें चि आत्मा हा करावें वश त्यांत तें ॥ २६ ॥
॥ आर्या ॥ ॥ चंचळ मन अस्थिर हें ज्या ज्या विषयाकडे चि बाधां
वें ॥ त्या त्या पासुनि आणुनि सूज्ञें त्द्दईं हळूच बांधावें ॥ २६ ॥ ॥
॥ दोहरा ॥ ॥ मन चंचल जित्त जित्त चलें ताकों राखे रोक ॥ करिसं
जम नित आतमा साजे ताकों ठोक ॥ २६ ॥ ॥ ओंवी ॥ मन चंचल
नाहीं स्थिर ॥ धांवें सैराट न धरी धीर ॥ तया आवरोनि विचार ॥ राहे
आत्मतत्त्वीं ॥ २६ ॥ ॥ अभंग ॥ ॥ ज्या ज्या पे पदार्थी चित्ताचें च
ळण ॥ निघे तेथें ज्ञान शुध ठेवी ॥ १ ॥ मन हें अस्थिर चंचळ पांडवा ॥

 याचा नित्य दावा परमार्थी ॥ २ ॥ ह्मणोनि जें पाहे तेथें आत्मा लावी ॥ व
शा त्वें बळ घी मनोवृत्ती ॥ ३ ॥ त्यांतची असतां विसरलें पुरे ॥ करावें जागे
रे तुका ह्मणे ॥ ४ ॥ २६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रशांतमनसं ह्येनं योगिनं सुख
मुत्तमम् ॥ उपैति शांतरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ॥ २७ ॥ ॥ सम० ॥
ऐशा प्रशांत चित्तातें योग्यातें सुख उत्तम ॥ साधे रजतमातीत ब्रह्मरूप
अकर्मक ॥ २७ ॥ ॥ आर्या ॥ ॥ शांतात्मा निष्पाप ब्रह्मीं कांहीं असे न
अंतरज्या ॥ उत्तम सुख वरितें त्या जो हा योगी अखंड शांतरजा ॥ २७ ॥
दोहरा ॥ ॥ जाके मनमे शांति है पापरहित जो होय ॥ मगन जु ब्रह्मानं
द कों ता जोगी को होय ॥ २७ ॥ ॥ ओंवी ॥ ॥ अंतःकरण ज्याचें शां
त ॥ त्या योगियासुख अत्यंत ॥ रजोगुणे ब्रह्मभूत ॥ ऐशिया प्रशांती
॥ २७ ॥ ॥ अभंग ॥ ॥ ऐसे या चित्तातें प्रशांतदशेला ॥ योग्य भा
से मला सुख पार्था ॥ १ ॥ साधे रजतमा अतीत ब्रह्मता ॥ रूप अकर्मता
तुका ह्मणे ॥ २ ॥ २७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ युंजन्नेवं सदात्मानं योगी

विगतकल्मषम् ॥ सुखेनब्रह्मसंस्पर्शमत्यंतंसुखमश्नुते ॥ २८ ॥
॥१५॥ ॥सम०॥ ॥ योजीऐसासदाचित्तयोगीज्यासनवासना ॥ ब्रह्मस्प
र्शेंअनायासेंअत्यंतसुखभोगितो ॥ २८ ॥ ॥आर्या॥ ॥ एवंसं
ततयोगीयोजीनिष्पापजोमनायास ॥ ब्रह्मस्पर्शसुखातेंपावेअत्यं
ततोअनायास ॥ २८ ॥ ॥दोहरा॥ ॥ जोजोगीइहविधिकरेजो
गपापकोंत्याग ॥ सहजब्रह्मकोंसुखलहेरहेआपअनुराग ॥ २८
॥ओवी॥ ॥ सदाआत्मचिंतनकरितां ॥ योगीकिल्बिषेंजिंतीतत
तां ॥ सुखेचिब्रह्मींसायुज्यता ॥ अनंतसुखपावतो ॥ २८ ॥ अभंग
चित्तसदायोजीजेसाकामींवधु ॥ किंचालक्षच्याधुधरीचनीं ॥ १ ॥ यो
गीतोपांडुयादुर्जानवासना ॥ मायेचीणतान्हासुखानेणे ॥ २ ॥ ब्रह्म
स्पर्शेंनिवेसायासेंवेंचला ॥ अत्यंतसुखालाभोक्तातोची ॥ ३ ॥ इत
रतींसोंगेंनव्हेसंपादणी ॥ तुकातेकाहाणीऐकचिना ॥ ४ ॥ २८ ॥ ॥ ॥१५॥
॥श्लोक॥ ॥ सर्वभूतस्थमात्मानंसर्वभूतानिचात्मनि ॥ ईक्षते

गी० योगयुक्तात्मासर्वत्रसमदर्शनः ॥ २९ ॥ ॥सम०॥ ॥ सर्वभू अ०
तांमधेंआत्माभूतेंतांआत्मयामधें ॥ नित्ययोगींचित्तअसेतोपाहेस ॥६॥
मदर्शनी ॥ २९ ॥ ॥आर्या॥ ॥ आत्म्यामाजींभूतेंपाहेभूतांतआ
त्मयासमहा ॥ दृढयोगयुक्तआत्माजाचातोंपाहणारजगसमहो ॥
॥ २९ ॥ ॥दोहरा॥ ॥ मोहीलखेसबठोरजोसबकोमोहिमांही ॥
मोकोंदेखतसोसदांसोहूंदेखततांहि ॥ २९ ॥ ॥ओवी॥ आत्मत्वें
सर्वभूतेदेखे ॥ सर्वात्माआपणकौतुकें ॥ योगयुक्तआत्मादेखे ॥ सर्व
त्रसमानतया ॥ २९ ॥ ॥अभंग॥ ॥ सर्वभूतांमध्येंआत्माअसे
येक ॥ भूतेंसकळिकआत्मयांत ॥ १ ॥ नित्ययोगीचित्तऐसाठेवीज
रीं ॥ सर्वनेत्रद्वारीसमदृशी ॥ २ ॥ योगनव्हेतरीऐसामार्गचाले ॥ ये
णेयोगेंफोलनव्हेसाधु ॥ ३ ॥ तुकाह्मणेरुष्णयेकनवलसांगे ॥ तो
श्लोकप्रसंगेंऐकीजेहो ॥ ४ ॥ २९ ॥ ॥श्लोक॥ ॥ योमांपश्य
तिसर्वत्रसर्वंचमयिपश्यति ॥ तस्याहंनप्रणश्यामिसचमेनप्रण

श्यति॥३०॥ ॥सम०॥ ॥मातेंसर्वत्रजोपाहेपाहेसर्वमद्‍तरीं॥
॥१६॥ मीत्याचात्याससोडीनातोमाझासोडिनामला॥३०॥ ॥आर्या॥
पाहेसर्वत्रमला माझ्याठाईंहि सर्वलोकांस॥माझात्यासींमजसींत्या
चानविनाशएकएकास॥३०॥ ॥दोहरा॥ ॥व्यापकहोसबजी
वमेंमोकोंसबकोय॥केसेंहूंकितहूंरहेताकोमामेजोय॥३०॥ओवी
मजसर्वांठायींचोखरे॥मीसर्वत्रत्यासदेखे॥माझेनिमिस्येंसुखें॥
मीत्याचातोमाझापें॥३०॥ ॥अभंग॥ ॥मातेंसर्वत्रांतजोपा
हेअर्जुना॥जगाचीभावनानदिसेजया॥१॥मजआंतविश्वघेतुहाअ
न्वयो॥व्यतीरेकेंसेव्योयोगचीतो॥२॥सोडिनामीमगत्याच्यात्या
सजाल्या॥सृष्टिप्रळयगेल्यारसातळीं॥३॥तोहिमजमगसोडिना
सहसा॥तुकाह्मणेकेसालाभमीहा॥४॥३०॥ ॥श्लोक॥ ॥
सर्वभूतस्थितंयोमांभजत्येकत्वमास्थितः॥सर्वथावर्तमानोऽपि ॥१६॥
सयोगीमयिवर्तते॥३१॥ ॥सम०॥ ॥सर्वभूतस्थत्यामा

 तेंभजेंधरुनियेकता॥मजमध्येंचतोयोगीप्रपंचींजरिसर्वथा॥३१॥
॥आर्या॥ ॥सर्वाभूतींमजजोएकत्वेंभजतपरमउद्योगा॥आ
सोनीविश्वांतहि माझाठाईंअसेचिसयोगी॥३१॥ ॥दोहरा॥
सबविखेंस्थितजोहोयइकलखेभजेजमोहि॥रहेकोनभांतिचह
मोंमेबरततजोई॥३१॥ ॥ओवी॥ ॥सर्वभूतींजोआत्मत्वेंभ
जत॥तोसर्वथासंसारींनाहींवर्तत॥मजचेगळेंनाहींहोइजेत॥तो
चिमीअसे॥३१॥ ॥अभंग॥ ॥सर्वभूतस्थात्यामातेंजाणो
नियां॥भजेयेकत्वींत्याभावधरी॥१॥मजमध्येंचितोयोगीयाजा
णपा॥तेजगर्भीआपावस्तीजेसी॥२॥जरींतोप्रपंचींसर्वथागुंत
ला॥तरींमुक्तत्यालाकाययाणूं॥३॥तुकाह्मणेब्रह्मलोकींचेरहिवा
सी॥आलेयाधरेसीसाकारत्वें॥४॥३१॥ ॥श्लोक॥ ॥आत्मौप
म्येनसर्वत्रसमंपश्यतियोऽर्जुन॥सुखंवायदिवादुःखंसयोगीपर
मोमतः॥३२॥ ॥सम०॥ ॥सर्वभूतींस्वदृष्टांतेंजोपाहेसमअ

र्जुना॥ सुखदुःखासहीयोगीतोथोरमजसंमत॥३२॥ ॥आर्या॥
॥१७॥ स्वानुभवेंसुखदुःखींज्याचीसर्वत्रदृष्टिसामान्य॥परमश्रेष्ठमहात्मा
पार्थायोगीनतोकसामान्य॥३२॥ ॥दोहरा॥ ॥सबकोंदेखे
आपसमसुखदुखएकेभाय॥सोजोगीसबतेंबडोमोमेरहेसमाय
॥३२॥ ॥ओवी॥आपलेंसुखदुःखसर्वत्र॥जेदेखतीजीवमात्र॥
तेयोगीपरमपवित्र॥तेथारममसंमत॥३२॥ ॥अभंग॥ ॥
समदृष्टींसर्वभूतें॥जोकापाहेमद्रूपातें॥१॥मजसमानजाणीजे॥
योगीअर्जुनावंदिजे॥२॥देहींसुखदुःखलागे॥त्याचानिखरनपा
वेगें॥३॥देवह्मणेंमाझ्याबोलें॥श्रेष्ठतुकयाकळलें॥४॥३२॥ ॥
॥श्लोक॥ ॥अर्जुनउवाच॥ ॥योऽयंयोगस्त्वयाप्रोक्तःसाम्ये
नमधुसूदन॥एतस्याहंनपश्यामिचंचलत्वास्थितिंस्थिराम्॥३३॥
॥सम०॥ ॥जोयोगहाबोलिलासीसाम्येंश्लोकचतुष्टयें॥त्या ॥१७॥
च्यास्थितीतेंस्थिरमीनदेखेंमधुसूदना॥ ३३॥आर्या॥जोयोगतु

गी० वांकथिलासाम्येंजेणेंघडेसदास्वरती॥ परित्याचंचलतेस्तवत्याची अ०
नदिसेमलास्थितीस्थिरती॥३३॥ ॥दोहरा॥ ॥जोगकह्योतुम ॥६॥
हमजमोकोंयेकसमान॥रहेनमोंचित्तचंचलहिजोतुमंकियोबखा
न॥३३॥ ॥ओवी॥ ॥पार्थह्मणेयोगसांगितला॥देवानाहींतो
म्यापाहिला॥चंचळमनयाला॥निग्रहकेंविघडे॥३३॥अभंग॥
करांजळीजोडोनियां॥अर्जुनपुसेकृष्णराया॥१॥आतांयोगबोलि
लासी॥साम्येंश्लोकचतुष्टयासी॥२॥स्थिरमीयाच्यास्थिती॥नदे
खेहेकोणगती॥३॥सांगमातेंमधुसूदना॥तुकाह्मणेजगजीवना॥
॥४॥३३॥ ॥श्लोक॥ ॥चंचलंहिमनःकृष्णप्रमाथिबलवद्दृ
ढम्॥तस्याहंनिग्रहंमन्येवायोरिवसुदुष्करम्॥३४॥सम०॥ ॥
कींकृष्णाचंचळमनइंद्रियेंजेंमथींबळी॥त्यांचानिग्रहवाऱ्याचीमो
टजेसीनबांधवे॥३४॥ ॥आर्या॥ ॥चंचलहेमनकृष्णप्र
माथिदृढसबळविषयशुष्करसें॥वंचीत्याचेंभासेधारणवायूसमा

नदुष्करसें॥३४॥ ॥दोहरा॥ ॥ मनहेंचंचलकृष्णजूबहुशो
कदृढजान॥ताकोंरोकेंपवनसमहे अतिकठिनसुजान॥३४॥ ॥
॥ओवी॥ ॥मनचंचलबहुकृष्ण॥इंद्रियांहूनिबळकरगहन॥वा
यूचेपरीजायघेवोन॥त्याचानिग्रहदुष्करअंसे॥३४॥अभंग॥
मनहेंचीकृष्णदेवा॥चंचळचागवीस्वभावा॥१॥इंद्रियांतबलोत्त
र॥ब्रह्महराअगोचर॥२॥याचानिग्रहवायूची॥मोटबांधुशक्ति
केंची॥३॥तुकायेतोकाकुळती॥येवढीचाराची फजीती॥४॥३४॥
॥श्लोक॥ ॥श्रीभगवानुवाच॥ ॥असंशयंमहाबाहो म
नोदुर्निग्रहंचलम्॥अभ्यासेनतुकौंतेयवैराग्येणचगृह्यते॥३५
॥सम०॥ ॥खरेंचहेंमहाबाहोमनचंचलदुर्जय॥अभ्यासें
आणिवैराग्येंतऱ्हींतेंजिंकिजेतसें॥३५॥ ॥आर्या॥चंचल
धरवेनाजेंनिःसंशयमनबहूततापडतें॥पार्थाअभ्यासानेंवैरा
ग्यानेंपरंतुसांपडतें॥३५॥ ॥दोहरा॥ ॥अर्जुनउत्तमसा

चकहि मनचंचळनगहाय॥जोगकियोबेराग्यसोंनिकेपकरोजाय
॥३५॥ ॥ओवी॥ ॥खरेंचिसांगतों अर्जुना॥मनचंचळआ
वरेना॥अभ्यासवैराग्यें जाणा॥जिंकिलेंजातें॥३५॥अभंग॥
हास्यमुखेंदैत्यध्वंस॥वदेखरेंचप्रश्नास॥१॥तुवां केलेंधनुर्धरा॥
महाबाहोपार्थवीरा॥२॥मनचंचळदुर्जय॥आहेमजळाप्रत्यय॥
॥३॥तरींअभ्यासवैराग्यें॥मनवळिजे संतसंगें॥४॥जिंकिजेल
जेव्हांमन॥तुकातेव्हांसमाधान॥५॥ ३५॥ ॥श्लोक॥असं
यतात्मनोयोगोदुष्प्रापइतिमेमतिः॥वश्यात्मनातुयतताशक्यो
वाप्तुमुपायतः॥३६॥ ॥सम०॥ ॥माझीहे बुधिकींयोगन
व्हेजोमननावरे॥प्रयत्नशीळेंस्ववशेंतोपावोंसकिजेमनें॥३६॥
॥आर्या॥ ॥धारेममतिलाजोअजितात्मायासियोगदुष्प्रा
प॥वश्यात्मायत्नकरीपावायाशक्यत्यासिनिष्पाप॥३६॥ ॥
॥दोहरा॥ ॥जिनपकऱ्योनचित्तनीजतापेंजोगनहोय॥जि

अपनोमनवसकियोलहतजततन्न सोई॥३६॥ ॥ओंवी॥ ॥ज्याचें
॥१९॥ अंतःकरणस्थिर नाहीं॥ तोदुःखेंकरूनियोगासिनपवेकांहीं॥ज्यास
आत्मावश्य झाला पाही॥ तोउपाययोगासि पावेसत्य॥३६॥अभंग
॥हेचिबुद्धिकीरे॥ योगनोहे साकारे॥१॥ मननाटोपेजंवपुरी॥योग
सिध्दिनत्यावरी॥२॥ ह्मणोनिप्रयत्नशीळानें॥वश्यकीजेयासाध
नें॥३॥ यत्नशीळापूढेंकिती॥ मगयादुर्मनाचीख्याती॥४॥ स्था
भयइंद्रियांचें॥ तुकयाबाळावागुलाचें॥५॥३६॥ ॥श्लोक॥
॥अर्जुनउवाच॥ ॥अयतिःश्रध्दयोपेतोयोगाच्चलितमानसः
अप्राप्ययोगसंसिध्दिंकांगतिंकृष्णगच्छति॥३७॥ ॥सम०॥
निष्ठाअसोनिअवसीमनयोगातुनीचळे॥ नमोक्षपावतांकृष्णजा
यकोणेगतिप्रती॥३७॥ ॥आर्या॥ ॥शिथिलश्रध्दाअसतांज्या
चें योगातुनीहिमनचळतें॥ पाउनियोगासिध्दिसकोणगती त्यासहें ॥१९॥
नमजकळतें॥३७॥ ॥दोहरा॥ ॥अजतिऔरश्रध्दासहितजो ०

गी० गभ्रष्टतापाय॥लहेनसिध्दिजोगकीकोनगतहिकोंजाय॥३७॥ ॥ अ०
॥ओवी॥ ॥पार्थह्मणेकृष्णनाथा॥भक्तियुक्तहोवोनिप्रयत्नक ॥६॥
रितां॥योगीचळोनिसिध्दिनपावतां॥कोणगतिपावे॥३७॥ ॥
॥अभंग॥ ॥अर्जुनपुन्हाविनवीतो॥एकऐकेहाशब्दतो॥१॥
निष्ठाअसोनिअळसें॥नाहींकेलापूर्णाभ्यास॥२॥पुढेंसाधनींबै
सतां॥गेलेंआयुष्यअनंता॥३॥चळेमनदोहींपक्षीं॥नातोप्रपंच
कमळाक्षी॥४॥कृष्णात्यासिगतीकोण॥ सांगेतुकाह्मणेखुण॥५॥
॥३७॥ ॥श्लोक॥ ॥कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिवनश्य
ति॥अप्रतिष्ठोमहाबाहोविमूढोब्रह्मणःपथि॥३८॥ ॥सम०॥
तोकायउभयभ्रष्टमेघाचेंजेंविथीगळे॥ अपकपावलामोहब्रह्म
मार्गींमहाभुजा॥३८॥ ॥आर्या॥ ॥जेअप्रतिष्ठकृष्णाब्र
ह्मपथामाजिमूढनसमाय॥होउनिउभयभ्रष्टछिन्नाभ्रापरिवि
रेनकींकाय॥३८॥ ॥दोहरा॥ ॥कीधोदुहनवभ्रष्टहेबाद

रसों बिन सांय॥ ताकों कछु न आसरो रहे मूढके भाय॥ ३८॥ ॥
॥२०॥ ॥ओवी॥ ॥ मूढपणें न पावतां॥ उभयभ्रष्ट तो तत्वतां॥ याची
गती विचारितां॥ नासे जैसें अभ्र दिसें वितळे॥३८॥ ॥अभंग॥
तो काय उभयभ्रष्ट॥ मेघ थिगळ पैं नष्ट॥ १॥ अपकें मोह पावे॥ ब्र
ह्ममार्गी न त्या पावे॥ २॥ महाभुज देवराजा॥ मतें आमुचें या का·
जा॥ ३॥ तुका ह्मणे हेंच भय॥ वाटे साधका निश्चय॥ ४॥ ३८॥ ॥
॥श्लोक॥ ॥एतन्मे संशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः॥ त्वदन्य
संशयस्यास्य छेत्ता नह्युपपद्यते॥ ३९॥ ॥सम०॥ ॥निःशे
षया संशयातें कृष्णा छेदिसि एक तूं॥ या संशयाचा संहर्त्ता न दिसे
तुज वांचुनी॥ ३९॥ ॥आर्या॥ ॥ या माझ्या संदेहा कृष्णा तूं
ची समर्थ वाराया॥ तुजवीण संशयाचा छेत्ता कोणी न या दवाराया
॥३९॥ ॥दोहरा॥ ॥ मेरे या संदेहकों दूरी करो जगदीस॥ मेटे ॥२०॥
या संदेहकों कोन करे तव रीस॥ ३९॥ ॥ओवी॥ ॥पार्थ ह्मणे

गी० कृष्णा॥ हा संशय छेदेंना॥ ॥ तुजवांचूनि दीनजना॥ न दिसे संशयप अ०
रिहरिता॥ ३९॥ ॥अभंग॥ ॥ निःशेष या संशयासीं॥ उरो नेदी हे ॥६॥
विवसी॥ १॥ तूं येक छेदिशी श्रीकृष्णा॥ आहे भरवसा सहिष्णा॥ २॥
संहर्ता या संशयाचा॥ ऐसा प्रताप कोणाचा॥ ३॥ गुरु न दीसे तुजवीण
तुका वाहे आपुली आण॥ ४॥ ३९॥ ॥श्लोक॥ ॥ श्रीभगवानु०
पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते॥ न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्ग
तिं तात गच्छति॥ ४०॥ ॥सम०॥ ॥ पार्था न येथें न स्वर्गीं त्या
चा नाश घडे कधीं॥ कल्याणमार्गी या कोण्हीं वा पा जाय न दुर्गती॥ ४०
॥आर्या॥ ॥ इहलोकीं परलोकीं नाश तयाचा कधीं न से बापा॥
सकृता चारें कोणी दुर्गति न पवे तसा चि संतापा॥ ४०॥ दोहरा॥ ॥
अर्जुन दोउ लोकमें ताकों होय न नास॥ भले करम जो करत हे ताकों नहिं
अधबास॥ ४०॥ ॥ओवी॥ ॥ देव ह्मणे योगाभ्यासीं नाहीं॥ ऐ
से कवणासी घडलें नाहीं॥ मोक्षमार्गी चालतां कांहीं॥ दुर्गती न जाय॥ ४०

॥२१॥ ॥अभंग॥ ॥ हर्षें बोले भगवान॥ वायां न जाय साधन॥१॥ येथें अथवा स्वर्गांत॥ बाधा त्यासि अपिडित॥२॥ मार्ग कल्याणदायक॥ कोणी दीन न व्हे लोक॥३॥ बापा न जाय दुर्गती॥ तुका ह्मणे याचि गती॥४॥४०॥ ॥श्लोक॥ ॥ प्राप्य पुण्यकृतांल्लोकानुषित्वा शाश्वतीः समाः॥ शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते॥ ॥४१॥ ॥सम०॥ ॥ पावोनि पुण्यलोकांतें वर्षें उमप राहुनी॥ शुची श्रीमंत सद्नीं तो योगभ्रष्ट जन्मतो॥४१॥ ॥आर्या॥ ॥ जे पुण्यवंत त्यांच्या लोकीं चिरकाळ भोगुनी इष्ट॥ श्रध्या श्रीमंताच्या सद्नीं घे जन्म योगविभ्रष्ट॥४१॥ ॥दोहरा॥ ॥पुण्यवंत लोक लहे रहे बहुत दिन जाय॥ जोगभ्रष्ट धनवंत शुचीतिन घरजनमे जाय॥४१॥ ॥ओवी॥ ॥पुण्यश्लोकस्वर्गपासी॥ वर्षें बहुत स्वर्गासी॥ शेवटीं श्रीमंताचे कुशीं॥ जन्म घेणे॥४१॥ ॥अभंग॥ ॥पुण्यलोकातें पावोनी॥ राहे अमृत सेउनी॥१॥ हर्षें भोग कल्प वरी॥ त्या ॥२१॥

गी० चीसत्ता रूरावरी॥२॥ मग इच्छा फिरलिया॥ पावे मृत्युलोकीं येया॥३॥ शुचि श्रीमंत घरांत॥ योगभ्रष्ट तुका रूत॥४॥४१॥ श्लोक अ०

अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम्॥ एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम्॥४२॥ ॥सम०॥ ॥ योगियांचेंच अथवा कुळीं होतो भल्याचिया॥ हा जन्म दुर्लभ बहु या लोकीं जो असे रिती॥ ॥४२॥ ॥आर्या॥ ॥ अथवा मृतिमंताच्या योग्याच्या जन्म घे कुलोत्तंसीं॥ ऐसें अतिदुर्लभ हें या लोकीं जन्म जाण सद्दृशीं॥४२॥ ॥ ॥दोहरा॥ ॥बुद्धिवंत जोगी कुल न आन लेय अवतार॥ जनम लहत ऐसो धरु न दुर्लभ है निर्धार॥४२॥ ॥ओवी॥ योगियांचें कुळीं जन्मोन॥ आपुल्या पुण्यें करून॥ लोकीं दुर्लभ होऊन॥ या लोकीं हे रिती॥४२॥ ॥अभंग॥ ॥ किंवा योगी यांचे पोटीं॥ योगभ्रष्ट पावे हरी॥१॥ अथवा भले कुळीं लोक॥ तेथें होय प्रकाशक॥२॥ जन्म दुर्लभ ईशाना॥ ऐसा लोभ त्या सज्जना॥३॥ माता

॥२२॥ पिताउभयपक्षीं॥तुकाचदे देवसाक्षी॥ ४ ॥ ४२॥ ॥श्लोक॥ तत्रतं
बुद्धिसंयोगंलभते पौर्वदेहिकम्॥ यततेच ततोभूयः संसिद्धौकुरुनं
दन॥४३॥ ॥सम०॥ ॥त्यादेहीं पूर्वदेहींचाबुद्धिसंयोग पावतो
मोक्षींमगबहूयत्नकरितोकुरुनंदना॥ ४३॥ ॥आर्या॥ तेथें
जन्मांतरिंचापावे संयोगयोगबुद्धीचा॥ योगीतोकींतेयापुनरपि
करितोप्रयत्नसिद्धीचा॥४३॥ ॥दोहरा॥ ॥तीनहोपहि
लीदेहकोंलहतबुधिसंजोग॥ जतनकरतहे सिधकोंबहुबिधसं
जोग॥४३॥ ॥ओवी॥ ॥ तयाजन्मींपूर्वदेहबुध्दी॥ तोमोक्ष
प्रयत्नकरीबोधीं॥ ज्ञानाभ्यासबळेंसिध्दी॥ साधिहेकुरुनंदना॥
॥४३॥ ॥अभंग॥ ॥ यादेहींपूर्वाभ्यासा॥ निजमानसापा
वेल॥१॥ पावेबुधिचासंयोग॥ पुन्हा योग आरंभी॥ २॥ मगमोक्ष
बहुयत्नें॥ वेचिरत्नेमतीची॥ ३॥ कुरुनंदनासायास॥ तुकाबहुस ॥२२॥
स्वीकारी॥ ४॥४३॥ ॥श्लोक॥ ॥ पूर्वाभ्यासेनतेनैवह्रियं

गी० तेह्यवशोऽपिसः॥ जिज्ञासुरपियोगस्य शब्दब्रह्मातिवर्तते॥ ४४ अ०
॥सम०॥ ॥त्यालातत्पूर्वअभ्यासबळेंयोगींचयोजितो॥पूर्वी ॥६॥
तोयोगजिज्ञासुतन्हींवेदांअतिक्रमी॥ ४४॥ ॥आर्या॥ त्यापूर्वा
भ्यासबळेंपरवशतोयोगमागुतामांडी॥ जाणोइच्छीयोगचिशब्द
ब्रह्मासितोचिवोलांडी॥४४॥ ॥दोहरा॥ ॥ सोतोअपनेबस
नहिंहेपहिलोअभ्यास॥ तातेंउपजेजोगजोब्रह्मशब्दमेबास॥ ४४
॥ओवी॥ ॥ पूर्वीअभ्यासाचाधडा॥ ह्मणोनियोगस्मरलापुढां
योगाचाविचारगाढा॥ वेदातेंअतिक्रमी॥ ४४॥ ॥अभंग॥
अभ्यासतोत्यालापूर्व॥ बाळसर्वपावतो॥ १॥ बाळयोजीचित्तजो
डे॥ भ्रांतीउडेमायिक॥ २॥ जिज्ञासुवेदागमा॥ शब्दब्रह्माभिलाला
॥३॥ नपडेधनदारपालर्वा॥ तुकायाचवीलागल्या॥ ४ ॥४४॥
॥श्लोक॥ ॥ प्रयत्नाद्यतमानस्तुयोगीसंशुधकिल्बिषः॥अने
कजन्मसंसिध्दस्ततोयातिपरांगतिम्॥४५॥ ॥सम०॥ ॥

